


लाल किल्ल्यांतील आठवणी

जनआवृत्ती

गोपाळ गोडसे

लाल किल्ल्यातील आठवणी

गोपाळ गोडसे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक

अजब डिस्ट्रिब्युटर्स

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

लाल किल्ल्यातील आठवणी : गोपाळ गोडसे

जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे

प्रकाशक

रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

प्रमुख वितरक

अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

अक्षरजुळणी

रावजी देसाई

मुखपृष्ठ

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक

श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

आवृत्ती

सप्टेंबर, २०१२ - २,००० प्रती

लाल किल्ल्यातील आठवणी

पढवून मढविलेली झापडे दूर करण्यासाठी बुद्धिवंतांना
व्यापक दिशा देणारे अितिहासदर्शक, देशगौरव व सुभाषचंद्र बोस
यांचे आजाद हिंद सेनेतील निजी कार्यवाह श्री. पु. ना. ओक
यांना

सस्नेह

सूतोवाच

गांधीहत्या अभियोगासंबंधीची मी लिहिलेली प्रकरणे क्रमाक्रमाने प्रसिद्ध झाली आणि पाठोपाठ त्या प्रकरणांचे पुस्तक झाले 'गांधीहत्या आणि मी.' त्या गोष्टीला आज या १९८१ मध्ये बारा वर्षांवर काळ लोटला. पुस्तक समहृत झाले. पुढे न्यायालयातून सुटले.

त्यावेळी विचार तरंगत होता लाल किल्ल्यातील संस्मरणे लिहावीत. नाही जमले. आता लाल किल्ल्यातील वास्तव्याला बत्तीस वर्षे झाली आहेत. एका काळी मनावर ठळकपणे कोरल्या गेलेल्या स्मृतींवरही कालशकटाच्या वर्दळीची धूळ बसून त्या धूमिल झाल्या आहेत. सुदैव येवढेच की मूळ आठवणींचा ठसा धुळीतूनही दिसत आहे.

आठवणी लिहिताना असा अनुभव येतो की घटनांच्या काळापासून जितके अधिक दूर जावे तितकी त्यांत अधिकाधिक अवांतर भर पडत जाते. त्याचे कारण मधल्या अवधीत मिळालेले ज्ञान, वाचलेली पुस्तके, अनुभवलेले सुखद किंवा दुःखद प्रसंग किंवा धक्के या योगे कथन शक्तीला आणि भाषेला जो आकार येतो त्याची छाप त्या मूळ स्मृतिकथनावर पडते.

मूळ आठवणीचा मध्यबिंदू तसाच ठेवून त्या बिंदूभोवती स्वतःच्या दृष्टीने आणि परीक्षेने चांगल्या शब्दांची वलये ठेवून त्या आठवणींचे प्रदर्शन करण्याचा मोह जेव्हा अनावर होतो तेव्हा त्या बाहेर पडतात.

आठवणींच्या रूपाने सांगण्याजोगे पुष्कळ असते. काही प्रसंग उद्‌बोधक तर काही विनोदी होऊन गेलेले असतात. ते प्रसंग अशा व्यक्तींसंबंधी घडलेले असतात

की ज्या व्यक्तींना सर्वसामान्यांपेक्षा वेगळे मूल्य असते. असामान्यांचा सामान्यपणाही कधी कधी कथनीय असतो. म्हणूनच न्यूटनसारख्या विख्यात खगोलशास्त्रज्ञाने आणि गणितज्ञाने मांजरासाठी मोठा झरोका आणि मांजराच्या पिल्लासाठी लहान झरोका केल्याचे वाचून आपणास विरोधाभासाने गंमत वाटते.

लाल किल्ल्यातील आमचे वास्तव्य मृत्यूच्या छायेत होते. आम्ही निर्बन्धांची कायद्याची-कोणकोणती उल्लंघने केली आहेत हे आम्ही जाणत होतो. स्वा. सावरकर यांना का अडकवले होते हे आम्ही जाणत होतो. डॉ. परचुरे यांनीही विधीचे उल्लंघन केलेले नव्हते. इतके असूनही आम्ही सर्वच मृत्यूच्या छायेत होतो.

त्या जीवनातही एक वेगळी गोडी होती. ती गोडी म्हणजे रोमहर्षकता.

स्वत: बनविलेले एखादे प्रयागात्मक ग्लायडर असावे, आकाशात उडण्याची तीव्र उत्कंठा असावी, अशावेळी ते ग्लायडर घेऊन जाताना, ते केव्हा कोसळेल याचा नेम नाही अशी एकीकडे भीती वाटत असतानाच दुसरीकडे, स्वत:च्या वाहनात बसून आपण भूतलाचे अवलोकन करीत आहोत याचा विलक्षण आनंद असतो. मृत्यूची भीतीच तिथे आकर्षक ठरते. ती रोमहर्षकता, ते 'थ्रिल,' तो 'रोमान्स'!

अशा वातावरणात आमचे दैनिक व्यवहार सहजपणे चालत असत. एरव्हीच्या जीवनात मोकळेपणा असतो तो तेथे होताच. त्यात भर म्हणजे बंधनाचा नवीन परिसर भोवती आल्याने त्यातून निर्माण होणारे विनोदही आम्हाला कोठच्या कोठे नेऊन पोहचवीत !

म्हणून वाटते, आपण जे भोगले आणि उपभोगले, त्यात काही प्रमाणात वाचकांनाही सहभागी करून घ्यावे. काहींना त्यात रुची वाटेलही !

पण तेवढाच सीमित हेतु नाही. त्या काळाची आणि आजच्या काळाची तुलना समोर येते. स्थित्यंतरे आहेत का ? असली तर कोणती ? ती देशाला अनुकूल की प्रतिकूल ?

जुन्या पिढीने आणि आजच्या पिढीने ते प्रत्यक्षत: पडताळून पहावे, कामाच्या रामरगाड्यातून वेळ मिळाला तर आपला मार्ग योग्य आहे का ते पारखावे, मान मागे

वळवून आपण कोठून निघालो आणि कोठे आलो त्याचेही निरीक्षण करावे, विचार प्रवृत्त व्हावे, हाही अेक उद्देश सहजच निर्माण झाला. त्या उद्देशांतून आठवणींना जोडून आणि काही ठिकाणी सोडून तो तुलनात्मक विषयही वाचकांच्या सम्यक् दर्शनासाठी लेखणीतून उतरला.

३-१-८१

गोपाळ गोडसे

अनुक्रमणिका

१.	लाल कोट	....	१५
२.	मला स्वप्नेच पडत होती	....	१८
३.	तिसरी गोळी कुठे गेली	....	२४
४.	चोर ऋषींचे राजे	....	२९
५.	विधिसंगति	....	३२
६.	गोपाळ किती खाईल	....	३७
७.	संशयाचा लाभ	....	४२
८.	भेटीची विरक्ति	....	४६
९.	मैं दुबारा हूँ	....	४९
१०.	हिंदु भावनेचे भांडवल	....	५४
११.	डॉ. परचुरे यांचे नागरिकत्व	....	५९
१२.	व्यासपीठाचा स्वामी	....	६४
१३.	झरणी	....	६८
१४.	मारणे चांगले नाही, नथुराम	....	७०
१५.	सुतळीचा तुकडा	....	७८
१६.	निधर्मीवादाची लागण	....	७९
१७.	वाटचालीचा टप्पा	....	८२
१८.	परिशिष्ट (१) रक्तविहीन (!) विभाजनानंतर हिंदुत्वाच्या समस्या	....	८५
१९.	परिशिष्ट (२) नेहरूंची भीती : हिंदुराज्य !	....	९१

+++

लाल कोट

कुणी कधी निर्मिले तुला रे !
मोगल खल इतिहास झाकती ।
वराह, ओम् आजही परंतु
हिंदुत्वाच्या खुणा राहती
संधीसाधुच्या स्थानावरती
राष्ट्रसाधु येताच भारती
खुलेल वैभव तुझे पुरातन
हिंदुराष्ट्र गाईल आरती ।

अलीकडे म्हणजे दोन एक वर्षांपूर्वी मी लाल किल्ला बघण्यास गेलो होतो. त्यातील इतर स्थळांसमवेतच, जेथे मी बंदी म्हणून राहिलो ते स्थान आणि जेथे अभियोग चालला, न्यायदान झाले, ती वास्तू बघण्यासाठीही माझी स्वाभाविकच जिज्ञासा होती. पण त्यावेळी त्याहीपेक्षा अधिक प्रभावी जिज्ञासा होती श्री. पु. ना. ओक यांच्या लाल किल्ल्याविषयीच्या पुस्तकाच्या दृष्टिकोनातून त्या कोटाचे निरीक्षण करण्याची.

त्या दृष्टीने मी ती स्थळे पाहिली. मला वाटले, आपण जेव्हा केव्हा लाल किल्ल्यातील आठवणी लिहिण्याचे प्रत्यक्षात उतरवू, त्या वेळी या मूक लाल किल्ल्यालाच आपल्या आठवणी सांगण्यास लावावे. थोडेसे डोळसपणे पाहता

कोणालाही भास होईल की, योगायोगाने हातोड्यांच्या आणि घणांच्या घावातून वाचलेले दगड नष्ट भ्रष्ट आणि विद्रूप झालेल्या दगडांचे अश्रू वर्णन करून सांगू बघत आहेत, पंजाबमधील किंवा बंगालमधील नरसंहारातून वाचून आलेल्या हिंदू निर्वासितांप्रमाणे !

सुंदर स्त्रियांवर बलात्कार करून त्यांच्यावर स्वामित्व ठेवून, त्यांच्याकडून मातृकुलद्वेष्टी मुस्लिम संतती निर्माण करावी तसे सुंदर हिंदू वास्तूंना अरबी फारसी लिप्यांनी असंबद्धपणे लिंपून टाकून त्यांना बुरख्यातील स्त्रीप्रमाणे उबवून टाकावे, त्या वास्तूंची निर्मितीच मुस्लिमांची आहे असा शिरजोरी आग्रह धरावा, अशी आपल्या पुराणकालीन आणि इतिहासकालीन वास्तूंची अवस्था ठिकठिकाणी झाली आहे.

मुस्लिम तुष्टीकरण हा स्वराज्यात सत्तेसाठी पाया ठरला. हिंदू वास्तू कशा उद्ध्वस्त केल्या गेल्या, त्यांचे बळाने वरवरचे मुस्लिमीकरण कसे केले हे बोलणे अवैध मानले गेले ! या वास्तूंवरील बलात्कार सप्रमाण सांगितला तर त्या सांगणाऱ्याला इतिहासचिकित्सक म्हटले न जाता सांप्रदायिक म्हटले जाते, जातीय म्हटले जाते, हिंदुत्व पसरविण्याचा त्याच्यावर दोष (!) येतो !

शासनाला स्वतःचा वाद नसला, 'इझम' नसला, पाया नसला तर स्वत्वाविषयीच त्याला संभ्रम असतो. शासनाची रचनाही बलात्कारित वास्तूप्रमाणे, विद्रूप घडत जाते आणि बाटग्या मुसलमानाप्रमाणे, आपल्याला अनुरूप सर्वांनी विद्रूप व्हावे हा शासनाचा आटापिटा असतो. त्या संभ्रमामुळे शासन हिंदूंशी दुर्व्यवहार करीत राहिले आणि म्हणून हिंदू वास्तूंना आपली जन्म[illegible] सांगण्याचे, आपल्यावरील अत्याचार सांगण्याचे स्वातंत्र्य मिळाले नाही. अत्याचारांचे निराकरण होणे तर दूरची गोष्ट !

अभिषेकाच्या पाण्याच्या निकासासाठी गोमुखी, अश्वमुखी, व्याघ्रमुखी किंवा वराहमुखी बनविण्याची हिंदू शिल्पांची परंपरा आहे. तीच गोष्ट पावसाच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी.

लाल किल्ल्याच्या दीवान-ई-खास च्या माथ्यावर पावसाच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी वराहमुखी आहेत. शहाजहानने लाल किल्ला बांधला असे शिकविले

जाते. ते खरे असले तर हिंदू वास्तूंच्या परंपरेतील वराहाची आकृती त्याला प्रिय वाटली असे गृहीत धरले पाहिजे.

छतांवरील वेलबुट्ट्या, कलश, आम्रपत्रे, ओमकार, तुला, खड्ग, आदि हिंदू चिन्हे शहाजहानने निर्माण केली असे गृहीत धरले पाहिजे.

पर्यायी, हिंदू वास्तू बळकावून त्यावर ठिकठिकाणी उद्ध्वस्ततेचा इस्लामी ठसा ठेवून जेथे उद्ध्वस्तीकरणाने उपयुक्त वास्तूच नष्ट होईल अशी भीती वाटली तेथे त्या खुणा तशाच राहू देऊन शहाजहानने ती वास्तू आपल्या अधीन ठेवली हे गृहीत धरावे लागेल.

तो विषय श्री. पु. ना. ओक यांनी विस्ताराने हाताळला आहे. आम्ही त्या ऐतिहासिक वास्तूत होतो, २७-५-४८ ते १६-४-४९ पर्यंत आमचे तेथे वास्तव्य होते. ही लाल किल्ल्यावरील पहिली आठवण.

+++

२ मला स्वप्नेच पडत होती

स्वातंत्र्याचे युद्ध शेवटी इथे लढविले गेले
पुन्हा पान सेनेने अपुल्या पराक्रमाने लिहिले
रक्षणकार्यी स्वत्वाच्या अन् इथे रक्त ओघळले
इथे सांगता होईल घेण्या वैभव घालविलेले !

विशालता, लयबद्धता, प्रमाणशीलता, वैभव आणि सौंदर्य या गुणांनी एकेकाळी परिपूर्ण अशी ती वास्तू पुन्हा हिंदूंच्या छत्राखाली आली होती.

त्यासाठी फार मोठे मोल दिले गेले होते, मुसलमानांसाठी हिंदुस्थानचाच एक भूखंड तोडून त्यांच्या स्वाधीन केला होता.

पण या भौतिक हानीपेक्षाही हिंदुस्थान बुद्धिवाद गमावून भ्रांतवादाच्या आहारी गेला होता ही फार मोठी हानी होती. स्वत्वाची सीमाच उद्ध्वस्त झाली होती. संस्कृती हा शब्द राहिला होता. संस्कृती गेली होती. विकृती आली होती. मोंगलांनी वास्तू विद्रूप केल्या, तर हिंदूंची मनेच आता विद्रूप झाली होती. स्वाधीनता प्राप्त होण्याच्या वेळी राज्यकर्त्यांच्या मनात विद्वेष राहिला असेल तर तो हिन्दुराष्ट्र या कल्पनेशी !

वर्ष १८५७ मध्ये हिंदुस्थानात झालेला सशस्त्र उठाव स्वातन्त्र्ययुद्ध होते हे स्वातन्त्र्यवीर सावरकरांनी इंग्रजीच्याच लिखाणातील टिपणे निवडून काढून जगासमोर मांडले होते. त्या स्वातंत्र्यसमरातील बहादुरशहा जफर याचा

'राजद्रोहाचा' अभियोग चालविण्यासाठी याच लाल किल्ल्याचा उपयोग इंग्रजांनी केला होता. स्वातंत्र्यसंग्राम आणि लाल किल्ला याची सांगड जमली होती.

त्या घटनेला उणीपुरी नव्वद वर्षे लोटली होती.

ब्रिटिश राज्यकर्त्यांना चकवून देशगौरव सुभाषचंद्रबोस हिंदुस्थानबाहेर गेले होते. देशभक्त सैनिकांची जमवाजमव करून, सेना उभारून पूर्वेकडून हिंदुस्थानवर आक्रमण करायचे आणि स्वराज्य मिळवायचे ही त्यांनी योजना आखली होती. स्वातंत्र्यवीर सावरकर ''हिंदूंनो सैन्यात प्रवेश करा, शस्त्रे हाताळण्याची अनायासे संधी आली आहे ती घालवू नका, योग्य वेळी शस्त्र कुठे वापरायचे हे लक्षात ठेवा,'' या प्रचाराने युवकांना प्रोत्साहित करीत होते.

ब्रिटिशांच्या शत्रूच्या हाती लागलेले सैनिक सुभाषबाबूंना मिळत होते.

स्वतंत्र हिंदुस्थानसेना, 'आजाद हिंद फौज' या संज्ञेने निर्माण झाली होती.

या सेनेने फार मोठा आक्रमक पवित्रा घेतला होता. पण पुन्हा हिंदुस्थानच्या वाट्याला या प्रयत्नात अपयश आले होते.

ब्रिटिशांच्या हाती लागलेल्या या सैन्याच्या सेनानींचा 'राजद्रोहाचा' अभियोग चालविण्यासाठी ब्रिटिश सत्तेने पुन्हा याच लाल किल्ल्याचा वापर केला होता.

ब्रिटिशांचा तो वारसा आता पंडित नेहरूंकडे आला होता.

पाकिस्तानची कल्पनाच मुळी मूर्खपणाची आहे, फॅन्टास्टिक आहे, पाकिस्तानची निर्मिती माझ्या प्रेतावरून होईल अशा बडबडीने नेहरू गांधींनी हिंदू जनतेला भुलविले होते आणि शेवटी या लोकांना धोका देऊन देशाची खांडोळी करू दिली होती. पण तेच नेते हिंदुराष्ट्र या कल्पनेवर चवताळत होते आणि रक्तपिपासू एकसत्ताधाऱ्याला शोभेल अशा शब्दांत आगपाखड करीत होते.

पंडित नेहरू धमकावण्या देत होते, ''हिंदू-संघटनावादी हिंदुराज्य निर्माण करण्याचा आग्रह धरीत राहतील तर ...? तर काय होईल? तर त्यांचीही गत तीच होईल जी हिटलर आणि मुसोलिनीची झाली !''

षंढपणाने पाकिस्तान निर्माण होऊ देणाऱ्या या विद्रूपवाद्यांचा पुरुषार्थ काय तर आम्ही हिंदुराष्ट्रवाद्यांना कुचलून टाकू ! आणि हिटलर मुसोलिनीसारखी स्थिती कोण करणार होते ? तर गांधींच्या अहिंसावादी तत्त्वांचा वारसा सांगणारे हिंदुस्थानचे बादशहा पंडित नेहरू !

हिंदू-संघटनवाद्यांच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ते आव्हान स्वीकारले होते. त्यांनी उत्तर दिले,

''राजकीय अर्थाने बोलायचे तर गांधीजी अद्याप दुपट्यात होते आणि पंडित नेहरू जन्मलेही नव्हते त्या वेळपासूनच ज्यांनी कर्दनकाळ ब्रिटिश सत्तेशी झुंज घेतली अशा शेकडो क्रांतिकारकांकडे हिंदुसंघटनेचे नेतृत्व आहे ही वस्तुस्थिती पंडित नेहरू विसरतात. त्यातील कित्येकांनी ब्रिटिश खड्ग आणि फाशीचा स्तंभ यांच्या धमकीला धुडकावून लावले आणि मृत्यूला आलिंगन दिले. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी अशा वीरांनी केलेला एकेकाचा त्यागही गांधीय मंत्र्यांच्या एकत्र त्यागापेक्षा अधिक भरेल. या पंडितासारख्या तकलुपी सरदाराच्या धमकावणीला हे क्रांतिकारक बधणार नाहीत. समजा, या क्रांतिकारकांना हिंदुत्वाच्या सन्मान रक्षणासाठी, वैभव रक्षणासाठी किंवा श्रेष्ठत्व रक्षणासाठी हिंदुराष्ट्र निर्माण करण्यात अपयशच आले तर त्या प्रयत्नाच्या अपराधासाठी (!) वाट्याला येईल ते कठोर भवितव्य ते आनंदाने स्वीकारतील. ते हिटलरसारखे असो वा मुसोलिनीसारखे... पण या उलट समजा, ते क्रांतिकारक हिंदुराष्ट्र स्थापन करण्यात यशस्वी झाले तर? तर या पंडितासारख्या हिंदुराष्ट्रद्रोही जनांची गत काय व्हावी ?''

(हे वक्तव्य इंग्रजी मराठा नियतकालिकात दि. २५-९-१९४७ ला प्रसिद्ध झाले होते. वरील परिच्छेद त्या पूर्ण वक्तव्यातून संदर्भापुरता घेतला आहे. परिशिष्ट २ पहा).

विभाजनानंतर स्वराज्य टिकविण्यासाठी सावरकरांनी वेळोवेळी सूचना दिल्या होत्या. झालेल्या चुका लक्षात घेऊन आता शासनाने पडखाऊ धोरण सोडून द्यावे हा त्यांचा आग्रह होता.

अनंत कान्हेरेच्या गोळ्यांनी जॅक्सनचे शरीर विद्ध व्हावे, किंवा मदनलाल धींग्राच्या पिस्तुलाने कर्झन वायलीचे हृदय भेदले जावे तसे स्वातंत्र्यवीरांच्या निर्भय, स्पष्ट वाणीने तत्कालीन काँग्रेस जनांचे हृदय फुटून जायचे. त्यांना भीती एकच वाटत होती. त्यांचा दांभिकपणा लोकांना कळता तर ते तत्कालीन नेते किती भीरू, किती स्वार्थी होते हे लोकांत उघडे पडेल. म्हणून, आपल्यासारखेच सारे विद्रूप व्हावेत, आणि पुरा हिंदुसमाज काँग्रेसजनांच्या दंभामागे उभा आहे असे दृश्य दिसावे ही त्यांची धडपड होती. अकबराला एखादाही राणा प्रताप नको होता. सर्वच मांडलिक हवे होते. नेमके तसेच, काँग्रेसी राज्यकर्त्यांना हिंदू हवे होते पण त्यांच्यातले सौंदर्य, स्वत्व, नष्ट झालेले हवे होते. हिंदुत्ववादी नको होते. कोणी राज्यकर्त्यांच्या विद्रूपत्वाशी विद्रोह करील तर त्याचा प्रतिशोध घेण्याचा त्यांचा उपक्रम चालू होता.

वृत्तपत्रे या ना त्या कारणाने शासनाची मिंधी होती. त्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकर आणि दुसरे हिंदुत्ववादी नेते यांची वक्तव्ये फारच थोडी वृत्तपत्रे प्रसिद्ध करीत.

अशा प्रतिशोधात्मक मनोवृत्तीमुळे शासनाने स्वातंत्र्यवीर सावरकरांना दि. २७-५-१९४८ या दिवशी त्या एकेकाळच्या हिंदूंच्या वैभवपूर्ण लाल कोटात बंदी म्हणून आणले ! गांधीवधाचे शासनाला निमित्त मिळाले होते. फाळणीचे पाप झाकण्यालाही त्यांना अवसर मिळाला होता.

मोगलांनी छळबळाने हिंदूंना मुसलमान बनविण्यासाठी तोच परिसर वापरला होता. मंदिर उद्ध्वस्त करून केलेली जामा मसजिद, गुरुतेगबहादुर यांच्या हौतात्म्याचे स्मारक असलेले शीशगंज गुरुद्वार, असंख्य हिंदूंचा संहार केलेली सुनहरी मसजिद (मंदिराची केलेली मशीद), आदी त्याच भागात आहेत. हिंदू वीरांनी मुस्लिम छळबलाला भीक घातली नाही आणि तिळतिळ शरीर कापून घेऊन मरण पत्करले तोही तोच परिसर !

हिंदूंना सोडून अन्यांना उर्वरित हिंदुस्थानातही स्वातंत्र्य मिळाले होते ! आणि तो अनाचार करीत होते हिंदू सत्ताधीश !

एकूण, स्वत्वासाठी, अस्मितेसाठी, आत्मगौरवासाठी लढणाऱ्या, बलिदान करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठीसुद्धा ब्रिटिशांच्या वारसाने, गांधींच्या राजकीय वारसाने पंडित नेहरूंनी लाल किल्ल्याचाच वापर केला ! कुणी सांगावे, उद्या हिंदुराष्ट्र स्थापित होता होताच, ज्यांनी विभाजनवादाला उत्तेजन दिले, निधर्मीपणाच्या नावाने राष्ट्रद्रोही जातीयता पोसली, शत्रूला साहाय्य केले, हिंदूंच्या कत्तलींची आखणी आणि कार्यवाही करण्यास बळ दिले त्या सर्वांचा अभियोग उद्याचे राष्ट्रधुरीण याच लाल किल्ल्यात चालवितील आणि वैभव प्राप्त करून देतील ! त्या भावी अदृश्यासाठीही आज लाल किल्ला उभा असेल !

ज्या स्वातंत्र्यवीराला उभ्या राष्ट्राने वंदन देऊन त्या लाल किल्ल्यात त्यांच्या हस्ते स्वातंत्र्याचे ध्वजारोपण करायचे त्यांना बंदिस्त अवस्थेत एका खोलीत कोंडून ठेवण्यासाठी नेले गेले होते. सावरकरांची गत हिटलर मुसोलिनीसारखी करण्याच्या आपल्या उद्देशांतील पूर्तीची पहिली पायरी म्हणून सावरकरांना हत्येच्या आरोपाखाली बंदी केले होते.

नेहरूंनी जिंकली होती. हिंदुराष्ट्रवाद विद्रूपवाद्यांच्या कैचीत अडकला होता!

ज्या धीरोदात्तपणे सावरकरांनी नेहरूंना सांगितले होते,

"समजा, या क्रांतिकारकांना हिंदुत्वाच्या सन्मानरक्षणासाठी, वैभवरक्षणासाठी, किंवा श्रेष्ठत्वरक्षणासाठी हिंदुराष्ट्र निर्माण करण्यात अपयशच आले तर त्या प्रयत्नाच्या अपराधासाठी (!) वाट्याला येईल ते कठोर भवितव्य ते आनंदाने स्वीकारतील !"

त्याच धीरोदात्तपणे त्यांनी आपल्यावर आलेले हे संकट झेलले होते. नेहरूंना आव्हान दिले म्हणून बंदिवास इतके समोरासमोर शासन वागले असते तर सावरकरांनी त्याच शब्दांत त्यांना उत्तर दिले असते. पण शासनाने त्यांच्या बंदीसाठी कारण मागच्या दाराने दिले होते, 'गांधीवधातील सहाभियुक्त !'

भावी संकटे दिसावीत त्या भाषेत सावरकर मला म्हणाले होते,

"मला स्वप्नेच पडत होती अलीकडे ! अंदमानच्या कोठडीत सर्व दिशांनी पावसाची झड येत आहे, कोठडीत पाणी झाले आहे, त्या झडीचा मारा

चुकविण्यासाठी मी एका कोपऱ्यात उभा आहे, पावले भिजून जाऊन गारठू लागली म्हणून मी काथ्याच्या तरटाची वळकटी करून त्या वळकटीवर उभा आहे ! थोड्याच वेळात त्या काथ्यानेही पाणी शोषून घेतले आहे ! माझी पावले त्या ओलाव्याने वळत आहेत !''

शासनाच्या हिंदुद्वेषी क्रूर वर्तनाने माझे मन ओरबडून निघाले !

+++

३ तिसरी गोळी कुठे गेली

विभाजनाच्या दिवसांत एकीकडे मुस्लिम बहुसंख्य प्रांतांत हिंदूंच्या कत्तली होत होत्या. तर दुसरीकडे हैद्राबाद संस्थानात हिंदू बहुसंख्य होते, पण संस्थानिक मुसलमान म्हणून आपल्या राज्यात हिंदूवर अत्याचार करण्याच्या उपक्रमाला त्याने तीव्र गती आणली होती. कोठे विलीन व्हायचे हे त्या संस्थानिकावर अवलंबून होते.

निजाम स्वतंत्र अस्तित्वाची स्वप्ने बघत होता. हिंदूंना दहशतीने आणि कत्तलींनी नमवता येते, स्त्रिया पळविल्या, त्यांच्यावर बलात्कार केले की तेवढ्या स्त्रिया पचनी पडतात, हिंदूंचे मनोधैर्य खचून जाते, हा मुसलमानांचा इतिहाससिद्ध अनुभव होता. त्यामुळे हिंदूंच्यावर जुलूम करून त्यांना त्यांचे अस्तित्वच असह्य करायचे, पाकिस्तानच्या साहाय्याने दक्षिणेत गोव्यापासून मच्छलीपट्टमपर्यंत मुस्लिम कल्लोळाची योजना करायची हा त्या वेळचा त्याचा डाव होता. त्याच्या जवळ लायकअली हा प्रधान होता. हिंदूंचा विध्वंस करण्यासाठी रझाकारांचे संघटन कासिम रझवी चालवीत होता. त्याच्या घोषणा होत्या ''लालकिले पर इस्लाम का झंडा फहरायेंगे !''

हैद्राबाद म्हणजे भागानगरमध्ये हिंदूंवर अत्याचार होत होते ते पूर्वापार त्यांच्यावर बळाने उर्दू लादली गेली होती. त्यांची घरे मुसलमानांच्या घरांच्या उंचीपेक्षा अधिक असू नयेत, हिंदूंच्या घरांना अशा दिशांना खिडक्या असू नयेत

की जेथून मुसलमानांच्या घरांचे अंतरभाग दिसतील, नोकऱ्यांत हिंदूंना वरची स्थाने दिली जाणार नाहीत, मंदिरातून घंटांचे नाद बाहेर जाणार नाहीत, अशासारखे दंडक हिंदूंवर सतत वाढत्या प्रमाणात लादले जात होते. अरब देशांतून अरबांची आवक करून त्यांची भरती केली जात होती.

हिंदूंना यथायोग्य प्रतिनिधित्व मिळावे म्हणून हिंदुमहासभेने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आदेशाने १९३८ मध्ये निःशस्त्र प्रतिकार आरंभिला होता. अखिल हिंदूंसाठी हे आंदोलन असल्याने आर्यसमाजीही प्रचंड संख्येने यात सहभागी झाले होते कारण हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाचे अनेक कार्यकर्ते मारले गेले होते.

त्या निःशस्त्र प्रतिकाराला गांधींचा विरोध होता. त्यांनी आर्यसमाजीयांना फोडण्याचा प्रयत्न केला आणि हिंदुसभेला एकाकी पाडण्याचा घाट घातला. त्यांना यश आले नाही. निजामाविरुद्ध, एका मुसलमान संस्थानिकाविरुद्ध ती चळवळ होती म्हणून गांधींचा विरोध होता. हिंदूंनी मुकाट्याने अत्याचार सहन केले नाहीत तर त्यांच्या अहिंसेला तडा जाईल ही अहिंसेची व्याख्या होती, मर्यादित यश मिळून वर्षभरात ते आंदोलन संपविलेले होते.

काँग्रेसमधील काही हिंदूंना त्यांच्या आजवरच्या चुकांची जाणीव होत होती. पण आत्मविश्वास, हिंदूंचा आत्मविश्वास, ही धारणाच नष्ट झाली होती. घोकले जात होते ते एकच 'A Hindu is a born coward; A Moslem is a born bully.'

म्हणजे हिंदू जन्मतःच डरपोक आणि मुस्लिम जन्मतःच आडदांड.

स्वातंत्र्यवीरांच्या वारंवारच्या सूचनांनी हिंदूंमधील-काँग्रेसमधील हिंदू विचारवंतांमधील आत्मविश्वास निर्माण होऊ लागला होता. त्याचे आणखीही कारण म्हणजे काँग्रेसचे हिंदू निधर्मीपणाचा कितीही प्रचार करीत असले तरी मुसलमानांनी त्या हिंदूंनाही काही सौजन्याची वागणूक दिली नव्हती. आत्मविश्वास येताच प्रतिकार आणि आक्रमण थांबविण्याला प्रत्याक्रमण सहज शक्य होते. प्रतिकार होत आहे म्हटल्यावर आडदांड मुसलमानही किती भेकड बनतात, त्यांच्या गोगलगायी बनतात याची उदाहरणे इतिहास वाचताना वारंवार प्रत्ययाला

येतातच. सर्वांनी मिळून एकवटून धक्का देण्याचाच अवकाश असतो. पहिल्याने काही विरोध झाला तरी मनोबल आणि शारीरिक बळ भावनेने भारून प्रतिकारार्थ झोकून दिले की मुसलमान टिकू शकत नाहीत.

स्वा. सावरकरांनी काश्मीरकडून होणाऱ्या संभाव्य आक्रमणाची तसेच हैद्राबादमध्ये शिजत असलेल्या दक्षिणेकडील संभाव्य उत्थानाची पूर्वसूचना शासनाला प्रकटपणे दिली होती. काश्मीरवरील आक्रमण चालूही झाले होते.

रक्तपात की पाकिस्तान या विकल्पात आम्ही रक्तपात टाळण्यासाठी पाकिस्तान निवडले हे नेहरूंचे समर्थन होते. त्यात अपमानकारक भीरूता स्पष्ट झाली होती. विचारधाराच ती राहिल्याने संभाव्य आक्रमणाचा प्रतिकार आपण आक्रमण करूनच करायचा हा विचार त्यांच्या मेंदूच्या आसपास फिरकणेही शक्य नव्हते.

सरदार पटेलांनी ती धडक एकदा दाखविली.

हिंदुस्थानच्या सैनिकी सामर्थ्याला कःपदार्थ समजल्याने आव्हान देणाऱ्या निजामाचा नक्षा उतरवायची त्यांनी योजना आखली. सावरकरांच्या उक्तीतील एका मर्यादित भागाचा त्यांनी स्वीकार केला. आक्रमणाच्या योजनेत, मंत्रणेच्या योजनेत आणि आक्रमणाच्या अभियानात कोणा मुसलमानाला प्रवेश दिला नाही.

मुसलमानांनी दक्षिणेकडील आक्रमणाच्या योजनेचा जो डांगोरा पिटला होता त्याने आभास असा निर्माण झाला होता की त्यांची सिद्धता फार मोठी आहे. खरे म्हणजे हिंदूंची प्रतिकारहीन मनोरचना कॉंग्रेस नेत्यांनी बनविली होती हेच मुसलमानांच्या दमदाटीमागील बळ होते. गांधीवादाचा जेवढा अधिक अंगीकार हिंदू करतील तेवढे मुसलमानांचे फावत होते.

एका मुहूर्तावर हैद्राबाद राज्यात सर्व दिशांनी हिंदुस्थानचे सैनिक घुसले. चौक्या स्वाधीन घेतल्या. शासकीय कार्यालयांवर धाडी घातल्या. अधिकारावर असलेले आरक्षी, वरिष्ठ कर्मचारी या सर्वांना घेतले. रझाकार रझाकार म्हणून ज्यांना म्हणत ते सर्व सूर्यप्रकाश होताच कोल्हे झाडीत लपून जातात तसे कोठे दडले त्यांचा पत्ताच लागला नाही. गावात गुंड म्हणून मातलेल्या मुसलमानांच्या गोगलगायी झाल्या. हे सर्व इतक्या झटपट झाले की शासनालाही आश्चर्य वाटावे!

आत्मविश्वास निर्माण झाल्यावर आक्रमक पवित्र्याने हिंदू किती शूर असतात याचा पुन्हा प्रत्यय आला आणि इतिहासात त्याची नोंद झाली. मुसलमानांवर भयानक अत्याचार होत आहेत, हिंदुस्थान शासनाने (पाकिस्तानने उर्वरित हिंदुस्थानाला भारत कधीच म्हटले नाही, हिंदुस्थान हेच नाव ते देत राहिले) निजामवर चढाई केली ती विश्वशांतीला धक्का देणारी आहे अशी हाकाटी मोठ-मोठ्याने पाकिस्तान करू लागले त्यापूर्वीच सर्व क्रिया आटोपली होती.

सरदार पटेल यांची 'पोलिस ॲक्शन' नेहरूंना, गांधींच्या वारसाला आवडली नव्हती. पण कृतीला प्रारंभही झाला होता. आता तुकडा पडेपर्यंत थांबणे नव्हते.

पटेल यांना दडपणाने विरोध करायला गांधीजी जीवमान नव्हते.

लाल किल्ल्यात आम्ही न्यायाधीन असताना लोकसभेतील चर्चा कानावर येत असत. एकदा गांधीवध या घटनेवर टीका करताना एका महिला सदस्येने म्हटले होते, नथुरामने एका गोळीने संघ मारला. एका गोळीने हिंदुसभा मारली. तिसरी गोळी कोठे लागली पत्ताच नाही !

हैदराबादवरील कृती चालू झाल्याचे वृत्त समाचारपत्रावरून कळताच नथुराम आणि नाना आपटे यांनी वल्लभभाईंना तार करून अभिनंदन करण्याचे ठरविले.

वर्ष १९३८ च्या त्या निःशस्त्र प्रतिकारात नथुराम पहिल्या तुकडीचा प्रमुख होता. त्या तुकडीला ११ महिन्यांची शिक्षा झाली होती. स्वाभाविकपणेच हैदराबाद हस्तगत झाल्यावर त्याला आनंद वाटला होता.

बंदिपालाकडून अनुज्ञा घेऊन दोघांनी तार लिहून सिद्ध केली. न्यायालयाला विचारून निर्णय घेता येईल असे बंदिपालांनी सांगितले. त्याप्रमाणे न्यायालय चालू होताच नथुराम आणि नाना यांनी आपली इच्छा प्रकट न्यायालयात व्यक्त केली. न्यायालयाने आरक्षी अधिकारी नगरवाला यास आदेश देऊन योग्य ती व्यवस्था करण्यास सांगितले.

दुपारी चहाच्या वेळी नगरवाला आमच्यात येऊन बसला. लोकसभेतील चर्चा नुकतीच झाली होती. तिचा उल्लेख करून नगरवाला म्हणाला, ''नथुराम

तुझ्या गोळ्यांचे न्यायालयात गणन आणि चिकित्सा होण्यापूर्वीच संसद सदस्य त्यांची चिकित्सा चालवीत आहेत ! तुला तुझ्या गोळ्यांचे गणन देता येईल !''

नथुरामने सांगितले दोन गोळ्या कुठे लागल्या हे ज्याने त्याने तर्क करावेत. तिसरी गोळी म्हणाल तर आजच ती वर्मी पोहोचली आहे ! तिसरी गोळी हैदराबादला लागली !

पोलिस ॲक्शन नंतर हैदराबादेत स्थिरस्थावर झाल्यावर आमच्यापर्यंत प्रतिसाद असे होते–

'हैदराबादच्या चढाई' ची पहिली फेरी जिंकली तीस जानेवारी एकोणिसशे अठ्ठेचाळिसला !'

+++

४ चोर ऋषींचे राजे

हुतात्मा खुदीराम बोस यांचे स्मारक करण्याची योजना कानपूरच्या युवकांनी आखली आणि पंतप्रधान पंडित नेहरूंना त्या उद्‌घाटनासाठी बोलविले.

खुदीराम बोस या १८ वर्षांच्या किशोराला मिदनापूर बंदिगृहात ११-८-१९०८ ला सकाळी ६ वाजता फाशी दिले होते. स्वातंत्र्याच्या सशस्त्र आंदोलनात प्रफुल्लचंद्र चाकी (रंगपूर) आणि खुदीराम बोस यांनी किंग्जफोर्ड या न्यायाधीशाला ठार मारण्याच्या प्रयत्नात दोन केनडियन बायांना मारले होते.

खुदीराम बोसचे बलिदान अनेक तरुणांना स्फूर्तिप्रद झाले. एका पाठोपाठ असंख्य युवक या स्वातंत्र्ययज्ञात आत्मार्पण करण्यासाठी उद्युक्त झाले. ब्रिटिशांच्या वतीने हिंदुस्थानचे पारतंत्र्य स्थिर ठेवण्यासाठी क्रांतिकारकांच्या प्रयत्नात खो घालणाऱ्या देशी अधिकाऱ्यांचा वध करण्याचा आणि हसत हसत आनंदाने फाशी जायचे ही परंपराच निर्माण झाली. अशा धक्क्यांनी ब्रिटिश राज्य जर्जर झाले. त्यांना हिंदुस्थानवर राज्य चालविणे दुष्कर झाले.

या क्रांतिकारकांच्या पायाभूत कार्याचा आधार अन्य आंदोलनांना मिळाला. त्या एकेका क्रांतिकारकांची महती प्रकाण्ड होती. त्यांच्या त्यागाला सीमा नव्हती.

खुदीराम बोससारख्या एका शस्त्राचारी युवकाच्या स्मारकासाठी आपल्यासारख्या गांधींच्या वारसाला बोलावण्याचे या मंडळींनी धाडस करावे

याने नेहरूंचा क्रोध अनावर झाला. त्यांनी त्या मंडळींना खडसावले. ''अत्याचारी मार्गाचा ज्याने अवलंब केला त्याच्या स्मारकाच्या उद्घाटनाला मी येणार नाही!''

आम्ही न्यायाधीन असताना हे वृत्त वाचले.

कविता करण्याचा त्या वेळी मला छंद जडला होता. संस्कृत श्लोकांचे मराठी श्लोक करायचे, काही स्वतंत्र रचना करायच्या असा माझा क्रम चालू झाला.

खुदीराम बोस यांच्या स्मारकाच्या उद्घाटनाला नेहरूंनी नकार दिल्यावर त्या नकाराला आपला निषेध व्यक्तविण्यासाठी मी चौदा ओळींचे एक 'सुनीत' केले होते. सावरकरांना ते दाखविले होते. त्यांना ते आवडले (असे ते म्हणाले). त्यांनी प्रोत्साहनही दिले.

ते माझे प्राथमिक धडे होते. एक श्लोक आठवतो तो असा होता--

आम्ही इच्छित ना जिवंतपणि ना मेल्यावरी स्मारके ।
जे केले जनजागरार्थ, अमुचे कर्तव्य होते निके ।।
तत्त्वभ्रष्ट भुतावळी चिकटली सत्तागृहाच्या शिता ।
हे सत्तान्ध पित्यासही न म्हणती तो होय माझा पिता ।।

कानपूरच्या त्या वृत्ताचा उल्लेख करून स्वा. सावरकर म्हणाले, ''हे नवीन नाही. देशभक्ती या गुणांची योग्यता जाणायलाही स्वतःमध्ये देशभक्ती हा गुण लागतो. नुसती स्तुतिप्रियता नव्हे ! मी यावर लिहिले आहे श्रद्धानंदमध्ये !''

''सुभाष हिंदुस्थानवर स्वारी करून आले तर मी त्यांना पहिली गोळी घालीन असे आव्हान देणाऱ्या आणि आपण फॅसिस्ट विरोधी आहोत असा आव आणून राजप्रियता मिळविणाऱ्याला सुभाष यांच्या प्रयत्नांचे कौतुक काय वाटणार आणि खुदीरामचे मूल्य काय कळणार !''

मी जरा दबकतच म्हटले, ''तात्या, आजाद हिंद सेनेच्या बचावासाठी नेहरू अधिवक्याचा डगला चढवून याच लाल किल्ल्यात आले होते!''

तात्या हसले ! म्हणाले, ''निवडणुकी तोंडावर होत्या ! 'जय हिंद' घोषणा आपलीच आहे आणि सुभाषांचा प्रयत्नही आपल्याच नेतृत्वाने होता हे

दाखविण्याची संधी ते कशी घालवतील ! फाळणी करून राज्य घ्यायचे होते ना ! तशी परिस्थिती दिसताच हे बिनबुडाचे दंभाचार्य क्रांतिकारकांचा जयजयकार करीत प्रभातफेऱ्या काढतील. भगतसिंगाची योजना आम्हीच केली होती म्हणतील! किंबहुना सावरकरांनाही क्रांतिपाठ आम्हीच दिले असेही म्हणतील!''

त्या पुढील निवडणुकीपूर्वी पं. नेहरू यांनी ग्वाल्हेर येथे झाशीची राणी लक्ष्मीबाईच्या पुतळ्याला वंदन केल्याचे वृत्त मी दंडित झाल्यावर वाचले. मनात आले, नेहरूंना विचारावे, झाशीची राणी कापसाच्या लड्यांनी इंग्रजांशी लढली की, तलवारी आणि बंदुकींनी ? पण सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे,

चोर ऋषींचे राजे बुध्यंधांच्या घरात होतात !

हेच खरे !

+++

५ विधिसंगति

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याशी त्या लाल किल्ल्यातील कक्षकारेत (सेल्युलर जेलमध्ये) आम्ही न्यायाधीन असताना बोलण्याइतपत माझी निकटता आली होती. मी तसा लहान होतो. बुद्धीने आणि वयाने, दोन्हीही. मला आकलन होऊ शकेल इतपत ते बोलायचे.

मी त्यांना तात्या याच घरगुती नावाने संबोधीत असे. माझ्या दृष्टीने तेवढ्या शब्दात राव किंवा स्वातंत्र्यवीर या गौरववाचक शब्दांतील भावनेचा समावेश असे. हेतुपुरःसर तात्याराव म्हणणे मला कृत्रिम आणि म्हणून अवघड वाटत असे. मी ते कधीच म्हटले नाही–म्हणजे संबोधनासाठी.

तात्यांचा माझ्याविषयी एक समज होता. त्यांना वाटायचे मी बुद्धिमान आहे म्हणजे हुशार आहे ! ते कधी कधी तसे नाना आपटे किंवा नथुराम यांच्याशी बोलत असत. केव्हा तरी माझ्यासमोरही ते तसे बोलायचे.

मी कधी निराकरण करण्याचा प्रयत्न केला नाही. तसे करणे म्हणजे तात्यांना परीक्षाच नाही असे म्हणण्यासारखे होते. दुसरे कौतुकासाठी म्हणून मला त्यांनी बुद्धिमत्ता चिकटवली असली तर तीही मला सुखद वाटायची ! समजा मी म्हटले असते 'मी कसचा बुद्धिमान ?' आणि तात्यांनी माझी ती उपाधी काढून घेतली असती तर ? मी कोणत्या श्रेणीत बसतो हे मला मनोमन ठाऊक होते. त्यांच्या त्या कौतुकाने आपण खरोखरीच आहोत त्यापेक्षा उंच आहोत असा भ्रम करून घ्यायचा नाही येवढेच मी समजत होतो.

तात्यांचा तसा समज व्हायला काही किरकोळ कारणे झाली होती. आपल्या बचावाचे लिखाण ते करीत असत. ते लिखाण चांगल्या म्हणजे सुंदर नव्हे पण सुट्या सुट्या वाच्य अक्षरात पुन्हा लिहिण्यासाठी ते मला देत.

एका वाक्यात तात्यांनी एस्पेशली Especially हा शब्द वापरला होता. ते वाक्य वाचता वाचता मला वाटले तेथे स्पेसिफिकली Specifically शब्द योग्य ठरेल. मी त्या शब्दापुरते स्थान मोकळे ठेवून समासात पेन्सिलीने स्पेसिफिकली लिहिले आणि त्याखाली मूळ शब्द एस्पेशली.

तात्यांना मी लिहिलेला शब्द पटला होता. ते दुसऱ्या दिवशी म्हणाले ''त्या दोन शब्दांच्या अर्थात जे अंतर आहे तो बारकावा तुझ्या लक्षात आला तर !''

मी म्हटले, ''मी सुचविले होते जो योग्य वाटेल तो शब्द घालता यावा म्हणून!''

तात्या पुन्हा म्हणाले, ''तुझा शब्दच योग्य आहे ! व्हेरी अप्रोप्रिएट.''

''म्हणजे 'चपखल' ना तात्या ? म्हणजे 'स्थलोचित' ?''

तात्यांना माझ्या त्या भाषांतराचेही कौतुक वाटले. त्यांनी फोड केली.

''स्थलाचा संबंध असेल तेथे स्थलोचित. वेळेचा संबंध असेल तेथे समयोचित.''

मला बरे वाटले. मी दोन्ही शब्द मनात जुळविलेले होते. तात्यांनी त्याला संमोदन दिले होते.

मी जणू काही एखादे विधेयक, एखादा मुद्दा सुचविला असावा असे तात्यांनी कौतुक केले.

मी मात्र कोणाशी याविषयी बोललो नाही.

***

एका शब्दावरून तात्यांनी मला माझे शिक्षण विचारले. मराठी लिहिताना मी अची बाराखडी कच्च्या बाराखडीसारखी लिहीत असे हे त्यांनी पाहिले होते. मी शालान्त परीक्षेतही मराठीतून उत्तरे लिहिण्याच्या उत्तरपत्रिकात अशीच बाराखडी वापरल्याचे त्यांना सांगितले. मी उत्तीर्ण झालो होतो! वर्ष १९३८-३९ होते.

तात्या म्हणाले, ‘‘म्हणजे त्या वेळीही शासनाने-विश्वविद्यालयाने-अची बाराखडी अस्वीकारार्ह ठरविली नव्हती तर !’’

भाषाशुद्धीचीही मी सवय लावून घेतली होती. हे त्यांनी पाहिले होते. त्याचा प्रारंभ त्यांनी मला विचारला होता.

विद्यार्थिदशेतच तात्यांचे भाषाशुद्धीवरील लेख मी वाचले होते. भाषाशुद्धी हे पुस्तकही वाचले होते. दुसरी भाषा शिकणे हा दोष नव्हे, तो तर गुण आहे. पण मराठी बोलताना मराठीच शब्द आपल्याला सुचू नये, वाक्यपूर्तीसाठी कुठे इंग्रजी तर कुठे अरबी किंवा फारशी शब्दांचा आश्रय घ्यावा लागावा यात आपली दुर्बलता दिसते हे मला पटत होते. मोठा नव्हे पण लहान अमरकोश मी कंठस्थ केला होता. काही निवडक शब्दांचा म्हणजे श्लोकांचा एक लघु अमरकोष आहे.

दुसऱ्या महायुद्धात पुष्कळ काळ मी इराक आणि विशेषतः इराणमध्ये होतो. इराणी लोकांशी माझा संपर्क येई. त्यांच्या फारसी-परशियन भाषेतील शब्द कळण्यासाठी मी शब्दाला प्रतिशब्द विचारून घेई. वाक्यरचना, प्राथमिक व्याकरण मी नागरीत लिहून घेतले होते. संस्कृत भाषेशी त्या भाषेचे मला विलक्षण साम्य आढळले. अनेक रूपे लक्षात येण्याइतकी अपभ्रष्ट आहेत. तर कित्येक रूपे तीच आहेत. मला फारसी लिहिता येत नव्हते. पण मला वाटायचे त्या भाषेला नागरी लिपीच अधिक व्यवस्थित ठरेल, किंबहुना कोण्या काळी तेथे लिपीही नागरी असेल अन् हिंदुस्थानचेच आधिपत्य तेथे असेल, ज्या योगे तेथे संस्कृतसदृश भाषेची जोपासना झाली असेल. फारसीची मूळ भाषाही संस्कृत असेल.

मी तेथल्या लोकांना, श्रमिकांपासून त्यांच्या अधिकाऱ्यांपर्यंत, पुढे पुढे माझ्याशी फारसी बोलण्यास सांगत असे. मीही त्या भाषेत बोलण्याचा सराव केला. आणि काही दिवस सैन्यात (माझ्या तुकडी) मी दुभाषाचे काम केले. फारसीचे इंग्रजी सांगणे आणि इंग्रजीचे फारसी !

(संपर्क नित्याचाच तुटल्याने आज सर्व विसरले आहे. पण फारसी बोलले जात आहे हे आजही कळते).

मराठीत किंवा हिंदीत कोणते शब्द त्याज्य हे मला इराण आणि इराकमध्ये प्रत्यक्षतः कळले.

('गांधीहत्या आणि मी' या पुस्तकात किंवा नंतरच्याही पुस्तकात जी शुद्ध मराठी मी वापरली त्याचे मूळ इतक्या खोल भूतकाळात आहे).

भाषाशुद्धीचा माझा हा उगम ऐकल्यावर तात्यांना वाटले असेल मी बुद्धिमान आहे !

***

भाषाशुद्धी याच विषयावरील एक आठवण तात्यांनी मला सांगितली. भाषाशुद्धी ही नवीन दिशा सावरकरांनी हिंदुस्थानला दिली होती. त्याच वेळी साहित्यात अग्रणी समजल्या गेलेल्या व्यक्तींनी उपहासाने आणि विडंबनाने भाषाशुद्धीला वाळीत टाकण्याचे योजले होते असे ते दिवस होते (नंतर स्थिती पालटली. आजही वृत्तपत्र दिनांक, अर्थसंकल्प, त्यागपत्र, परिपत्र, महापौर, दिग्दर्शन, नगरपालिका, स्थगित संसद, लोकसभा, शिरगणती किंवा जनगणना हे शब्द निःसंकोचपणे वापरतात. ते कोणाला आज खटकत नाहीत. आज खटकेल ती अशी भाषा-

म्युनिसिपालिटीच्या मेंबरांनी जो रेझोल्यूशन केला त्याला चेअरमनने अप्रूव्हल दिले नाही. कॉर्पोरेशनचा मेयर सिक झाल्याने मीटिंग तहकूब झाली. युनिव्हर्सिट्यांची खानेसुमारी करायला हवी.

(आजही वृत्तपत्रे यास मराठी मानीत नाहीत. आजचे साहित्यिकही अशा भाषेचा बहिष्कार करतात).

अशा त्या विडंबनाच्या दिवसात एके ठिकाणी जलपानाला साहित्यिक एकत्र आले होते. बोलता बोलता एक जण म्हणाला, ''तात्याराव, तुमचा विधी शब्द ऐकताच सकाळची आठवण होते !''

सर्व साहित्यिक हसले होते.

इतर विषय बोलता बोलता पाच एक मिनिटे गेली. तात्यांनी त्या साहित्यिकाची आपुलकीने चौकशी केली.

''सध्या कुठे राहता ?''

''अमुक ठिकाणी.''

‘‘परिवार काय आहे ?’’

‘‘मिसेस आणि मुलगा. मुलगा लहान आहे.’’

‘‘लग्न केव्हा झाले ?’’

‘‘झाली दोन वर्षे.’’

‘‘विधी कुठे न्यायालयात झाला की, कार्यालयात झाला ? की घरीच ?’’

‘‘आणि सगळ्या लोकांसमोर भर मांडवात विधी केलात तुम्ही ? या वयात ?’’ तेव्हा त्या माणसाच्या लक्षात आले की, विधी हा शब्दप्रयोग सकाळच्या प्रयोगापेक्षा सामाजिक नियमांनी बांधलेल्या कार्यासाठी आणि म्हणून मंगलप्रसंगासाठीही करतात.

विधीची परत पोहोच झाल्याने सर्व जण हसले होते.

तेच सूत्र पुढे धरून तात्यांनी विचारले, ‘‘तुम्ही मिसेस आणि मुलगा म्हणालात. मिसेस आणि सन का नाही म्हणालात ?’’

क्षणभर गोंधळून त्याने उत्तर दिले, ‘‘मिसेस’ रूढ आहे ‘सन’ नाही !’’

तात्यांनी सांगितले, अनिष्ट रूढी तोडायसाठी तर भाषाशुद्धी हवी ! तुमची स्त्री इंग्रज असली तरीही ती पत्नी, जाया, भार्या, कान्ता, गृहिणी, बायको. मिसेस नव्हे ! जिथे आपला शब्द आहे तिथे आपला वापरायचा ! पाय अन् गुडघे धड असताना कुबड्या नाही वापरायच्या !’’

तात्यांनी त्या बैठकीतील दोन-तीन साहित्यिकांची नांवेही सांगितली होती !

✦✦✦

६ गोपाळ किती खाईल

विनोदाचा एक स्तर असतो. ज्याच्याशी विनोद करायचा त्याच्या श्रेणीवर तो अवलंबतो. काही विनोद निरुपद्रवी असतात. विनोद व्यंगात्मक असेल तर ज्याविषयी विनोद असेल ती व्यक्ती तेवढी समंजस लागते. असे हलके-फुलके विनोद आमच्या सर्वांच्याचकडून नेहमी होत असत.

दिल्लीत पंखा ही उन्हाळ्यात आवश्यक वस्तू असते. आम्ही बंदी होतो तरीही खोल्यांसमोर पंखे दिलेले होते. खोल्यांच्या दारांचीही एक कथा होऊन गेली होती.

लाल किल्ल्याच्या तटाच्या भिंतीत ज्या ओऱ्या होत्या त्यांना खोल्यांचे स्वरूप देऊन आमची कक्षकारा बनविली होती. आजाद हिंद सेनेचे आरोपीही तेथे ठेवले होते. नंतर पडवीला काटेरी तारेची जाळी बसविली होती.

या विशेष बंदिगृहाची पूर्णता झाल्याचे प्रतिवृत्त संबंधित अधिकाऱ्याने सरदार पटेल यांना दिले. आपली स्वामिनिष्ठा विशेषत्वाने दाखविण्यासाठी त्या अधिकाऱ्याने सांगितले की, दारे लाकडी ओंडक्यांची केली आहेत. ओंडके म्हणजे पाच-सहा इंच जाडीचे रूळांना आधार म्हणून घालतात त्या ओंडक्यांची.

‘‘बिजागऱ्या ?’’ पटेलांनी विचारले.

‘‘चांगल्या आहेत.’’

‘‘हवा खेळायला खिडक्या मोठ्या आहेत ?’’

‘‘नाहीत.’’

‘‘मग ?’’

‘‘आढ्याला म्हणजे छताला झरोका आहे चार इंच व्यासाचा !’’

पटेलांना कल्पना आली. या माणसाने अंधारकोठड्या बनविल्या होत्या ! त्यांनी विचारले, ‘‘अभियोग कोणावर चालवायचे आहेत ?’’

अधिकाऱ्याच्या लक्षात आले नाही. तो म्हणाला, ‘‘तेच तर आरोपी ठेवायचे आहेत ! महात्माजींचे मारेकरी !’’

‘‘तुम्ही मुडद्यांवर अभियोग चालविणार आहात काय ?’’ पटेल कडाडले.

अधिकारी हतबुद्ध होऊन बघतच राहिला !

पटेल म्हणाले, ‘‘ज्या खोलीत हवा खेळत नाही, दार बंद केल्यावर उजेडही नाही तिथे माणसाचे काय होईल ? मुडदा नाही का होणार त्याचा ?’’

‘‘पण महाराज, गांधीजींना मारले आहे त्यांनी !’’ अधिकारी स्वतःच्या विशेष दक्षतापूर्ण व्यवस्थेचे समर्थन देऊ लागला.

‘‘गांधींना मारले असेल नाही तर देवाला मारले असेल ! आधी जा आणि बंदिगृहात खोल्यांना असतात तशी लोखंडी गजांची दारे या खोल्यांना बसवा.’’

अधिकारी प्रणाम करून जाऊ लागला. पटेलांनी त्याला थांबविले. बजावले, ‘‘तशी दारे लावून झाल्याचे मला कळवा. तोवर आरोपींना तेथे ठेवू नका. आणि पंख्यांची व्यवस्था करायला सांगा.’’

लगेच दारे बदलली गेली. गजांची दारे लावली. नथुरामच्या खोलीत तेवढा एक ओंडका ठेवला गेला. (अधिकाऱ्याचा मान राखायचा म्हणून !) गजांचे दार तेवढेच अरुंद केले गेले.

मास्कोविच बंदिपाल आमच्याशी काही ‘अंदरकी बातें’ बोलत असे. ते लक्षात आल्यावर त्याची बदली केली गेली. भगतराम म्हणून दुसरा पंजाब बंदिगृहाशी संबद्ध बंदिपाल तेथे आणला गेला.

दुपारी करकरे आपल्या खोलीच्या दारात उभे राहून नाना आपटे यांच्याशी काही बोलत होते. करकरे यांच्या धोतराचा सोगा दाराजवळील पंख्यात लपेटला

गेला. पंखा बंद झाला होता. गुंडी बंद करून करकरे पंखा उलटा फिरवून धोतराचा फरारा त्यातून सोडवून घेण्याच्या खटपटीत होते.

नथुराम स्नान करून त्या खोलीवरून आपल्या खोलीत येत होते. ते करकऱ्यांना म्हणाले, ''धोतर कशाला घातलेत पंख्यात ?'' आणि आपल्या खोलीकडे निघून गेले !

***

एकदा सकाळी चहाच्या वेळी तात्या हातात पावाचे काठ घेऊन करकरे, आपटे, नथुराम चहा-कॉफी घेत होते त्या खोलीत गेले. ''तुम्हाला हे पावाचे तुकडे हवे आहेत का'' असे म्हणून त्यांनी ते त्यांना दिले. ते घेत घेत नाना म्हणाले, ''तात्या, गोपाळला होतील की !''

तात्यांचा चहा बघणे, पाव त्यांना हवा तसा व्यवस्थित करणे, त्यांचे दूध ठेवणे, अंथरूण नीट करणे ही कामे न सांगताच माझ्याकडे आली होती. मी ती आनंदाने करीत असे. कित्येकदा तात्यांचा आणि माझा चहा एका ठिकाणी व्हायचा. कधी तरी पावाचा तुकडाही मी घेत असे. पाव तात्यांनाच मिळत असे.

तात्या म्हणाले, ''किती खाईल ! तुम्ही घ्या आपले !''

जणू मी पाव खाऊन उरला तर इतरांच्या वाट्याला जात असे !

***

एके दिवशी दुपारी न्हावी आला नव्हता आणि दुसऱ्या दिवशी न्यायालयात जायचे होते म्हणून तात्या न्हाव्याची वाट बघत होते. न्हावी त्यांच्यासाठी आठवड्यातून तीनदा यायचा. आमच्याजवळ आमची खोरी होती.

न्हावी का आला नाही म्हणून शिपायाला तात्यांनी चौकशीला धाडले .

मी तेथेच होतो. नानाही तेथेच होते.

नानांच्या अडचण लक्षात आली. ते म्हणाले, ''तात्या, माझे साहित्य देऊ का तुम्हाला ? चांगले आहे.''

''नको नको. मला कापते.''

नाना म्हणाले, "मला कधीच कापले नाही. केव्हाही !" नानांनी निश्चयात्मक सांगितले. विषय सहजच निघाला होता.

तात्या म्हणाले, "जातिवंतांची गोष्ट वेगळी !"

* * *

आम्हा सर्वांना अर्धा शेर दूध प्रत्यही मिळत असे. समोरच स्वयंपाकघर होते. तेथे स्वयंपाकी आणि त्याच्या जोडीला एक साहाय्यक असे. सकाळी चहा करून द्यायचा. दूध तापवून द्यायचे, न्यायालयात जाण्यापूर्वी साडेनऊच्या बेताला जेवण द्यायचे, संध्याकाळी न्यायालयातून परत आल्यावर पाच साडेपाचला चहा द्यायचा, संध्याकाळचे जेवण सहापर्यंत द्यायचे हा स्थूलपणे कार्यक्रम असे. न्यायालयात मधल्या वेळात चहा येई.

अधून मधून आम्ही आपल्या पैशाने थोडे अधिक दूध मागवीत होतो. श्री. गणपतराय अधिवक्ता काही खाण्याच्या वस्तूही आणून द्यायचे. न्याय साहाय्य निधीमधून हा व्यय केला जाई. सर्वांचा मिळून महिन्याला अधिकात अधिक शंभर रुपयांपर्यंत व्यय होत असे.

स्वयंपाकी त्या दोघांसाठी दूध काढून ठेवी आणि उरलेले आम्हाला देई. अर्ध्या शेरात काही घट ही मान्यच होती.

काही दिवस दूध अतिशय पातळ येई. आम्हाला समोर स्वयंपाकघरात जाता येत नसे आणि त्याच्यावर लक्ष ठेवण्याचे मनातही नसे.

आम्ही एकदा बंदिपालकडे प्रतिवाद केला. सकाळी सकाळीच त्याला बोलावून आणले. दूध किती पातळ आहे ते दाखविले.

माझी आपली कल्पना की, स्वयंपाकी आता भिऊन जाईल. पण त्याने सरळ सांगितले, "पानी डालनेसे दूध पतला होताही है !"

"किंतु पानी क्यों डाला तूने ?" बंदिपालाने विचारले.

तरीही स्वयंपाकी निश्चल ! म्हणाला, "बाबूजीनेही बताया पानी डाला करो!"

बंदिपालाने आमच्याकडे पाहिले ! नथुराम यांनी त्याला तसे सांगितले होते !

स्थिती अशी होती की, अर्ध्या शेर दुधात स्वयंपाकी फारच घट करू लागला होता. प्रत्येकातला चौथा भाग थोडा देऊ लागला. चहाचे दूध त्याच्याकडे वेगळे मिळत असे. दूध थोडे का देतोस असे त्याला विचारल्यावर त्याने सांगितले होते, "तपानेसे जल जाता है !" नथुराम यांनी त्याला सुचविले होते. दुधात थोडे पाणी घातले की तेवढे जळून जाईल आणि स ाळ्यांना पुरे दूध देता येईल ! त्याचा लाभ घेऊन स्वयंपाक्याने भरपर पाण्याचे दूध आम्हाला देण्यास आरंभ केला होता !

"अरे, पाणी घातल्यावर पुन्हा माप अपुरे का भरलेस ?" त्याला विचारले.

त्याने दुसऱ्या बापूजींकडे संकेत केला. "बापूजी बोले, हमे थोडा घट माप चलेगा !"

ते होते डॉक्टर परचुरे ! त्यांनी केव्हा तरी सांगितले होते, "जेवढे दूध उष्णतेने आटेल तेवढे आम्हाला थोडे घालीत जा !"

बंदिपालाने आपल्या भाषेत त्याला दम भरला. "दुधात पाणी घालायचे नाही, सर्व दूध यांच्याकडे मिळाले पाहिजे !" कारण भरपूर माप देऊन दूध आटते त्याचीही भरपाई दुधवाला करीत असे.

"नाही तर तुला काढून टाकीन" हे बंदीपालाने म्हटल्यावरही स्वयंपाक्यावर परिणाम झाला नाही. तो कोणी शिक्षा संपलेला दुबारा (बंदीगृहाच्या वाऱ्या करणारा) होता. दूध मात्र पुन्हा व्यवस्थित येऊ लागले. थोडी घट आता तो आमच्या संमतीने देत असे.

+++

७ संशयाचा लाभ

सकाळी तात्यांच्या खोलीत गेलो तो तात्यांनी सांगितले, ''गोपाळ, काल रात्री १० वाजता मी ताडकन उठलो !''

''काय झाले ?''

''औषध घ्यायचे विसरलो होतो !''

तात्यांना झोप येत नसे म्हणून झोपेचे औषध तेथल्या डॉक्टरांनी त्यांना चालू केले होते. ती बाटली त्यांच्याजवळ नसे. प्रत्येक दिवशी संध्याकाळी बंद झाल्यावर पहारेकरी एका लहान पेल्यात त्या दिवशीचा अंश कार्यालयातून आणून त्यांना पोहोचवीत असे.

वृत्तपत्रे वाचून झाली, काही लिखाण लिहून झाले की, झोपण्यापूर्वीचे शेवटचे काम म्हणजे ते औषध घेणे हा तात्यांचा क्रम असे.

मी विचारले, ''किती वाजता झोपलात ?''

''तसा आठलाच झोपलो. थंडी वाजत होती म्हणून रजई पांघरून झोपून गेलो.''

''मग उठलात कशाला ?''

''सारखे वाटत होते काही तरी काम राहिले आहे ! त्या स्थितीतच झोप आली. आणि दहाच्या जवळपास एकदा लक्षात आले की, औषधच नाही घेतले मी !''

मी हसत म्हटले, ''तात्या, औषधावाचून झोप येत असली तर बळे बळे औषध कशाला घ्यायचे ! राहिले असते तसेच !''

''नाही नाही ! औषधावाचून मला झोप येत नाही !''

मला मात्र वाटले, ती वस्तुस्थिती असेलही. पण त्याच्याच सह मानसिक परिणामही असेल ! औषधावाचून झोप नाही असे सवयीने मनानेच घेतल्याने तशीच झोप कधी लागली तरीही मन ती झोपच स्वीकारीत नसेल ! कोणास ठाऊक, अशा मानसिक धारणेच्या व्यक्तींना डॉक्टरांनी तशाच चवीचे काही मिश्रण दिले तरीही आपण झोपेचे औषध घेतले या समजुतीने झोप येईल ! आणि कोणास ठाऊक झोपेच्या औषधांच्या संभाव्य दुष्परिणामांपासून बचाव करण्यासाठी आमच्या त्या बंदीगृहाच्या डॉक्टरांनीही पुढे पुढे तसेच केले असेल!

औषधावाचून झोप नाही या स्वतःच्या स्थितीचे तात्यांना काहीसे वैषम्य वाटायचे. आमच्यांत करकरे घोरणारे होते. फार मोठ्याने घोरायचे. तात्यांच्या खोलीनंतर नाना आपटे आणि करकरे यांची खोली नंतर डॉक्टर परचुरे यांची. नंतर नथुराम आणि मी यांची. नंतर मदनलालची. त्यानंतर पडवीला एक दार केले होते, पलीकडे शंकर किस्तय्या एका खोलीत आणि दिगंबर बडगे दुसऱ्या खोलीत ठेवलेले असत.

घोरणे म्हणजेच निश्चित झोपेचे चिन्ह असे कदाचित तात्या मानीत असत. एकदा दुपारी मोकळा वेळ होता. न्यायालय नव्हते. अशा वेळी आम्हाला दुपारी तीन वाजेपर्यंत बंद करीत असत. करकरे त्यांच्या खोलीत झोपले होते. ते घोरत होते.

दारे उघडल्यावर मी तात्यांच्याकडे गेलो. ते पडवीतच हातात वृत्तपत्र घेऊन उभे होते. मी जाताच मला म्हणाले, ''गोपाळ घोरते कोण !''

मी म्हटले ''करकरे.''

''केवढ्या मोठ्याने घोरतात ते ! त्यांना काही ढिम्म आहे का ? अभियोग चाललाय ! एवढाल्या शिक्षाही होतील ! घोरत पडताहेत आपले!''

तात्या इतके बोलत आहेत तोच करकरे आले. तात्या त्यांना म्हणाले, ''तुम्ही घोरता का ?''

''छे ! छे ! मी कधी घोरतो ? नाना घोरत असेल !'' नाना तिकडे येतच होते त्याकडे बोट करून ते म्हणाले.

नाना म्हणाले, ''वा ! गुरु ! आता घोरणेही माझ्यावर ढकललेत का ?''

करकरे म्हणाले, ''तात्या हे सगळेच मला बनवतात. मी अशिक्षित आहे ना! सगळे मिळून मला सांगतात तू घोरतोस म्हणून ! मी तर एकदाही ऐकले नाही !''

''पण आता मी म्हणतो आहे !''

''तात्या, तुम्हाला कुणीतरी सांगितले ! गोपाळने असेल. आता या खोलीत आम्ही दोघे झोपतो. नाना आणि मी. दोघांच्या पैकी कोणी तरी घोरत असेल. संशयाचा लाभ मला मिळायला पाहिजे !''

संशयाचा लाभ ही भानगड करकऱ्यांनी माझ्याकडून समजावून घेतली होती. तीन चार दिवसांपूर्वी न्यायालयातच एक प्रसंग झाला होता.

नथुराम यांनी सांगितले होते, '' मला वाटले मी दोन गोळ्या सोडल्या. पण प्रत्यक्षात तीन गोळ्या सुटून गेल्या होत्या हे स्पष्टच आहे.''

प्रमुख अभियोजक श्री. दफ्तरी उठून म्हणाले होते, ''आरोपीला वाटले दोन गोळ्या सोडल्या पण प्रत्यक्षात तीन सुटल्या होत्या, म्हणून संशयाचा लाभ आरोपीला मिळावा असा युक्तिवाद मांडला जाण्याची शक्यता आहे !''

सर्व न्यायालय या विनोदाने हसले होते.

नथुराम यांनी तो विनोद परतवला होता. त्यांनी सांगितले, ''परिणाम न्यायालयासमोर आहे. तेव्हा दोन गोळ्या की तीन यात जो संशयाचा लाभ असेल तो न्यायालयाने अभियोजकांच्या पदरात टाकावा !''

सर्व श्रोतृवृंदाने या उत्तरातील विनोदालाही मुक्तकंठाने प्रतिसाद दिला होता.

करकरे यांच्या मनात संशयाचा लाभ हे सूत्र पक्के बिंबले होते !

नाना पड खाईनात ! ते म्हणाले, ''करकरे, तुम्हाला घोरताना पकडले तर?''

करकरे म्हणाले, ''केव्हाही ! मला उठवत जा लगेच. माझे घोरणे मी ऐकले तर मी सांगेनच की मी घोरतो म्हणून !''

+++

८ भेटीची विरक्ति

भेटीच्या संबंधात तात्या कठोर असत. त्यांच्या या वर्तनावर त्यांच्या जवळच्या लोकांनीही त्यांच्यावर टीका केलेली आहे.

त्या न्यायाधीन स्थितीत सर्वचजण दोराच्या सावलीत होते. धारा तीनशे दोनचा आरोप याचाच अर्थ दोराच्या छायेत राहून हातपाय हालवून सुटण्याचा प्रयत्न करा. जमले नाही तर दोर तुमची सुटका करील !

मन व्याकुळ असेल तर घरच्या मंडळींना पदोपदी बोलावून आपल्या सुटकेसाठी, सांत्वनासाठी परोपरीने सांगणारे आरोपी अनेक असतात. एरव्हीचे कठोर किंवा कणखर मनही कोलमडावे अशी ती अवस्था असते.

दुसरीकडे, घरच्या मंडळींनाही वाटत राहते की आपल्या माणसाला भेटावे, काही खटपट करणे शक्य असल्यास करावी. निदानपक्षी भेटून मिळणारे समाधान तरी द्यावे.

तात्यांची कन्या कै. सौ. प्रभात चिपळूणकर दिल्लीतच असे. विधिज्ञांच्या माध्यमातून तिचे कितीतरी निरोप यायचे. आम्ही दोघे भेटून जातो. अगदी थोडा वेळ चालेल, पाच मिनिटेही पुरतील, इत्यादी.

पण तात्यांनी केव्हाही त्यांना भेटीस येण्यास सांगितले नाही. आपली भेट हा कारावास लादला गेला त्यापूर्वी झालेलीच होती. भेटून कामही काही सांगायचे नाही अन् तुमचीही काही अपेक्षा असू नये !

घरच्यांच्याहीसाठी आणि त्या अवस्थेत तात्यांनी भेट टाळली होती. या स्वभावाचे समर्थन करावे किंवा करू नये. पण इतरांच्या भेटीच्या संबंधात त्यांचे जे वर्तन असे त्याची संगती लागू शकते.

नंतरची एक घटना संगतीसाठी येथे स्थलोचित होईल. स्वा. सावरकर स्वातंत्र्यसमर वर्षाच्या शताब्दीसाठी १९५७ मध्ये दिल्लीत गेले होते. त्यावेळचे राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी त्यांना राष्ट्रपतिभवनात भेटीला बोलावले. तो निरोप येताच सावरकरांच्या सभोवार असलेल्या मंडळीत चर्चा झाली, तात्यांच्या समवेत कोणी कोणी जावे. कारण तो एक बहुमान होता आणि राष्ट्रपतीचे स्वातंत्र्यवीरांशी जे बोलणे होईल ते प्रत्यक्षपणे ऐकण्याची संधी मिळणे ह्याही एक सुयोग होणार होता.

स्वा. सावरकरांना निर्णय करण्यास वेळ लागला नाही. राष्ट्रपतीचे मोल ते जाणत होते. आमंत्रणाचे महत्त्वही त्यांना कळत होते.

त्यांनी आमंत्रणासाठी आभार मानले आणि भेटीला नम्रतापूर्वक नकार दिला! त्यांचे म्हणणे, मला राष्ट्रपतीकडून काही मागायचे नाही ! शासनाला जे काही सांगायचे ते मी प्रकटपणेच सांगतो, आता त्यांच्या भेटीच्या इच्छेविषयी म्हणाल तर त्यांनी केव्हाही वेळ ठरवून माझे घरी यावे त्यांचे स्वागत होईल.

राजकारणात तर कोण कोणाला भेटतो याला फार महत्त्व असते. समजा, विभाजनापूर्वीच्या काळात गांधींनी केवळ हिंदूंचेच नेतृत्व स्वीकारले असते, हिंदूंचे प्रतिनिधी म्हणून ते उभे राहिले असते, तर त्यांना मिळालेल्या प्रचंड अनुयायित्वाच्या बळावर जीना त्यांच्या पुढे लोटांगण घालीत आला असता. जीनाकडे गांधी जातात याचाच अर्थ गांधींना जीनाकडून काहीतरी हवे आहे असा होतो आणि जीना आपला अडवणुकीचा अधिकार बजावतो. गांधी मुसलमानांना अनुदाने करीत ते ते हिंदू म्हणून. भेटीला जात तेही हिंदू म्हणून. हिंदूंचा वाटा मारण्याचा आपला अधिकारच असल्यासारखे ते वागत ते हिंदूंचा पुढारी म्हणून. पण ते नुसते हिंदूंचे पुढारी आहेत असे म्हणताच अपमान मानीत.

परिणाम असा झाला की गांधीच जीनापुढे लोटांगण घालू लागल्याने पुरी हिंदू जातीच भीरू आहे हा समज बळावला, आणि शूराची अहिंसा या भोंगळ गोंधळात अडकून हिंदू जाती प्रतिकारशून्य झाल्याने हिंदू राहणे येवढ्याच अपराधासाठी लक्षावधींच्या संख्येने ते मुस्लिम तुष्टीकरण नीतिप्रवर्तक गांधींच्या तथाकथित छताखाली ठार मारले गेले.

कोण कोणाला भेटतो यावर राजनीतीत श्रेष्ठत्व मानले जाते.

+++

९ मैं दुबारा हूँ

लाल किल्ल्यातील त्या आमच्या बंदीगृहापासून लाल किल्ल्यातील एका वास्तूत वसविलेले विशेष न्यायालय दोन फर्लांग अंतरावर होते. आम्हा आरोपींना बंद गाडीतून तेथे नेले जात असे.

एके दिवशी काही कारणाने गाडी वेळेवर येऊ शकली नाही. काही बिघाड झाला होता. आरक्षींच्या सांगण्यावरून बंदिपालाने सूचना धाडली, ‘‘आज पायीच जायचे आहे. गाडी नाही.’’

आम्ही, विशेषतः मदनलाल, करकरे, मी, हुरळून गेलो ! प्रत्येक दिवशी बंद गाडीतून गेल्याने आम्हाला परिसराचेही आकलन होत नसे. आज अनायासे पाय मोकळे करण्याचीही संधी आली आहे असे आम्हाला वाटले. बरे, आरक्षींच्या समवेत जायचे, त्यामुळे कदाचित हातकड्या, काढण्या किंवा साखळदंड इत्यादी लटांबराचा आम्हाला काही विधिनिषेध नव्हता.

या सर्व विचारात स्वा. सावरकरांचा विचारच आम्ही केला नव्हता !

तात्यांची खोली सर्वात शेवटची. मी तात्यांना सांगितले, ‘‘बंदिपाल म्हणत आहेत आज पायी जायचे आहे.’’ तात्यांनी विचारले, ‘‘का?’’

‘‘मला वाटते गाडी बिघडली आहे.’’

जवळच असलेल्या पहारेकऱ्याला तात्यांनी सांगितले, ‘‘बंदिपालांना माझा निरोप सांगा, मी बोलावले आहे.’’

दोन मिनिटांतच बंदिपाल आले. आपण होऊनच ते म्हणाले, ''आज बहुतेक आरक्षींची गाडी येणार नाही.''

''मग ?''

''पायीच जावे लागेल !''

सावरकरांनी सांगितले, ''आरक्षी अधिकाऱ्यांना सांगा, मी पायी जाणार नाही. गाडीची व्यवस्था होऊ दे. तुमच्या नियमांनी तुम्हाला मला पायबेड्या घालायच्या असल्या तरी माझी ना नाही.''

''गाडी बिघडली आहे म्हणताहेत.''

बंदिपालाने नम्रतेने सांगितले.

''ती नीट झाल्यावर आणा, नाहीतर दुसरी आणा.''

बंदिपाल निघून गेले.

आमचे विधिज्ञ कै. आण्णाराव भोपटकर यांना त्यांचे गाडीतून सावरकरांना न्यायालयात नेले जावे, अशी आरक्षी अधिकाऱ्यांनी विनंती केली. त्यांनी ती आनंदाने मान्य केली आणि गाडी बंदीगृहाच्या दाराशी आणलीही. पण तेवढ्यात आरक्षींची गाडी नीट होऊन आली. आम्ही सर्व आरक्षींच्या गाडीतूनच न्यायालयात गेलो. त्या दिवशी न्यायालय अर्धा तास उशिरा चालू झाले.

***

प्रत्येक सोमवारी बंदिपाल बंदीगृहात येऊन तो बंद्यांची पाहणी करी. त्याच वेळी खोल्या, स्थानघर, शौचकूप स्वच्छ आहेत की नाहीत याचीही पाहणी तो करी. बंद्याने-न्यायाधीन बंद्याने सुद्धा, आपापले इतिहासपत्रक-हिस्टरी टिकेट आपल्या जवळ ठेवायचे आणि नीट उभे राहून ते डाव्या हाताने स्वतःच्या छातीला लावून बंदिपालाला वाचता येण्याजोगे धरायचे असा विनयनाचा नियम असे.

आम्ही अनेकदा पाहिले, तात्या आपले इतिहासपत्रक त्या दिवशी त्याच विनयनाने ठेवीत, बंद्यांच्या पद्धतीने उभे राहात !

बंदिपालाला आमच्यामधले आणि सावरकरांमधले अंतर जाणवत असे. तो एकदा विनोदाने सावरकरांना म्हणाला, ''सावरकरजी, ये लोग तो आप जैसे खडे नही रहते ! वैसे आपसे हमारी अपेक्षा भी नहीं होती है ।''

सावरकर म्हणाले, ''अभी नये बच्चे है । आगामी कारावासमें वे भी मेरे जैसे खडे रहेंगे ! मैं तो दुबारा हूँ ।''

होय ! तात्या दुबारा होते खरे ! स्वातंत्र्य मिळेपर्यंत स्वातंत्र्याचा आग्रह धरल्याने त्या सत्ताधीशांचे ते लक्ष्य होते. स्वातंत्र्य मिळाल्यावर हिंदू स्वातंत्र्याचा आग्रह धरल्याने या तथाकथित स्वकीय सत्ताधीशांचे ते लक्ष्य झाले होते !

विषय निघता निघता सावरकर म्हणत होते, ''आपल्या सारखे लोक नेहमी अल्प मतातच राहणार !''

''असे का ?'' मी कुतूहलाने फोड विचारली.

''शासन कसे असावे म्हणजे शायनाने कोणत्या धोरणाने वागावे, कशी पावले उचलावीत हे जो निरपेक्षपणे सांगतो आणि तसे शासन करून दाखविण्याची क्षमताही बाळगतो त्याला दूर ठेवले जाते. हे फलित समजून आपले कर्तव्य म्हणून काम करायचे असेल तर करावे, नाहीतर राजमार्ग आहेच ! मानसिंहने नाही का आपले कल्याण करून घेतले !''

***

आमच्या वाट्याला आलेला हा बंदिवास बघून म्हणजे बंदिवासाचे परिवर्तित स्वरूप बघून मात्र तात्यांना क्षणोक्षणी त्यांनी भोगलेल्या यातनांची तुलना आठवायची. ते म्हणायचे,

''अरे ! याला का बंदीगृह म्हणतात ? सेवेस एक स्वयंपाकी, दूध पिताय, डॉक्टर येत आहेत, औषधोपचार करीत आहेत, काही होत नसले तरी जणू सुचवीत आहेत काहीतरी होत आहे म्हणून सांगा, भेटीत वस्तू मिळत आहेत, हातापायात बेड्या नाहीत ! तीनशे दोनशे आरोपी असून! ही तर तुरुंगाची थट्टा आहे !'' अंदमानात म्हणजे काही आजार आहे असे म्हटल्यावर पहारेकऱ्यांची किंवा बंदी अधिकाऱ्यांची मनधरणी करून डॉक्टरकडे न्यायला सांगायचे, तेथे डॉक्टरने तपासायचे, पण बंदिपाल आणि डॉक्टर यांचे बमगोलेवाल्यांविषयी आधीच संकेत ठरलेले असल्याने डॉक्टरने सांगायचे, याला काही होत नाही, घेऊन जा कामाला, काम चुकविण्यासाठी म्हणून बरे नसल्याचे ढोंग करीत आहे !

बंदिपालाची, पहारेकऱ्यांची सौजन्यपूर्ण वागणूक बघूनही त्यांना वाटायचे, खरोखरीच हे बंदीगृह आहे का ?

बंदीगृहाची भीषणता तात्यांनी अनुभवली असल्याने तात्यांना बंदीगृहाची ही नवीन माणुसकी असंबद्ध वाटायची.

तात्यांनी याचि देही याचि डोळा स्थित्यंतर पाहिले होते. ती आठवण झाली की माझ्या मनात एक विचार येऊन जातो, हिंदुस्थानचे स्थित्यंतर बघायला कोण्या दिव्य शक्तीने आज शिवाजीच हिंदुस्थानात अवतरला तर ?

तर शिवाजी म्हणेल, अरे, तुमच्या जवळ सुधारक बुद्धी आहे ! माझ्या काळात या भूखंडांत मोगलांकरवी जे छळबळाने मुसलमान झाले त्यांना पुन्हा हिंदू करून आपल्यात सामावून नाही घेतलेत तुम्ही अद्याप ? तुमच्या जवळ वाहतुकीची यांत्रिकी साधने आज उपलब्ध आहेत. माझ्या काळात कधी पन्हाळ्याहून रायगडला जायचे, रायगडहून लोहगडला जायचे, किंवा लोहगडहून सिंहगडला जायचे तर घोड्यावरून जायला लागायचे. माझ्या मावळ्यांसह मी जायचोही ! जीप गाड्या नव्हत्या की मोटर गाड्या नव्हत्या ! तारायंत्र नव्हते की बिनतारी यंत्र नव्हते. इतकी साधने तुमच्याजवळ असून शेतकऱ्यांचे जीवन सुधारता नाही आले तुम्हाला ? कशाला ठेवला आहेत तो पाकिस्तानचा तुकडा ! आ बैल मार मुझे पैकी धंदा ! डोकेदुखी आहे, डोकेदुखी आहे म्हणून रडता काय ? तुम्हीच निर्माण करून ठेवली आहेत ना ती ? तुमच्याजवळ काय नाही ? रणगाडे नाहीत ? क्षेपणास्त्रे नाहीत ? विमाने नाहीत ? आण्विक शक्ति केंद्रे नाहीत ? बुद्धी नाही ? संख्याबळ नाही ? देशभक्तीची हृदये नाहीत ? काय नाही ? अन् हे सर्व आहे तर तो तुकडा नाही स्वच्छ करता येत तुम्हाला ? अग्रेसर राष्ट्रे म्हणून अद्यापही तुम्ही अमेरिका किंवा रशियाकडे बघता ? जगातली राष्ट्रे तुमच्याकडे सामर्थ्यसंपन्न राष्ट्र म्हणून अद्याप बघत नाहीत ? माझ्या काळी भ्रष्ट झालेली मंदिरे अद्याप तुम्ही पूर्ववत् केली नाहीत ? ठिकठिकाणी मशिदीत बाँबचे कारखाने चालू ठेवण्यात आंधळेपणाने मोकळीक ठेवली आहेत ? माझ्या वेगळ्या तुटपुंज्या, अपुऱ्या साधनांनी, थोड्या अवधीत जे मी या हिंदुभूमीसाठी केले ते तुम्हाला एवढ्या मोठ्या कालखंडात करता आले नाही ?

पण पुन्हा विचार येतो शिवाजीला आजच्या आणखी एका स्थित्यंतराची जाणीव नसावी. त्याला सांगावेसे वाटते, ''महाराज, तुमच्या स्मृतीचा जयजयकार होतो याने भ्रमित होऊ नका ! तुम्ही आज जीवमान नाही म्हणून आम्ही जयजयकार करतो. तुमचा जयजयकार करणारे आम्ही प्रतिशिवाजी धर्मान्तरित आहोत ! धर्मनिरपेक्ष हाच आमचा नवा धर्म आहे ! अकबराच्या नव्या धर्मांचेच हे प्रतिरूप आहे ! आज अकबर नाही म्हणून त्याची पिल्लावळ आम्ही राष्ट्रपतिपदावर अन् मंत्रिपदावर ठेवतो ! भवानी तलवार मिळविण्याच्या आमच्या प्रयत्नांत तुम्हाला चाहणारे अनेक जण धर्मनिरपेक्ष धर्माचे करून घेता यावेत हा आमचा उद्देश असतो! ती तलवार आज चालविता येणार नाही म्हणूनच आम्ही ती मिळविणार आहोत! आजचे राज्य तलवारीचे नाही ही आम्ही देत असलेली व्याख्याने ऐकत नाही तुम्ही ?

काय ? खरे नाही वाटत ?

महाराज ! अनुभव घ्याच तुम्ही ! निवडणुकीला उभे राहून दाखवाल ? महाराज तुम्हाला, प्रत्यक्ष शिवाजीला, मते मिळतील पावणे दोनशे अन् तुमच्याविरुद्ध उभ्या असलेल्या प्रतिशिवाजीला मिळतील पावणे दोन लाख !

तरी पण महाराज ! प्रतिशिवाजी जिंकून आल्यावर पहिले काम करील ते हेच की, तुमच्या पुतळ्याला हार घालणे !

मला शिवाजीला सांगावेसे वाटते, महाराज ! आपण आपले समाधीत जाऊन स्वस्थ असा ! झाकली मूठ रहायचा संभव तेथेच आहे ! आम्ही आपले नाव घेत घेत हिंदुत्वाचा मुडदा पाडतो तेवढे पुरे आहे ! आपला नको मुडदा पडायला !

+++

१० हिंदु भावनेचे भांडवल

सिंधू नदीमध्ये गांधीजींची रक्षा विसर्जित करण्याची विनंती पाकिस्तानने फेटाळल्याचे वृत्त आम्ही न्यायाधीन असताना वाचले. त्या नकाराची प्रतिक्रिया हिंदुस्थान शासनाकडून काय होते याचीही आम्ही वाट बघत राहिलो.

प्रतिक्रिया नव्हतीच ! कोण्या हिंदुराष्ट्राने असा नकार दिला असता तर हे निधर्मी शासन चवताळून उठले असते. पण हा नकार मुस्लिम राष्ट्राचा होता. पाकिस्तानचा होता, निधर्मीपणाच्या समागमातून झालेल्या त्यांच्या अपत्याचा होता !

आपले पाकिस्तानमधील उंच्चायुक्त स्वर्गीय श्री. श्रीप्रकाश यांची कशी संभावना झाली असेल याची आपण कल्पना करू शकतो. काँग्रेसच्या चळवळीत शौकतअली आणि महमदअली हे गांधीजींच्या खांद्याला खांदा लावून लढले असे गांधी समजत असत, इतरांची समजूत करून देत असत. कारण हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक दाखविण्यासाठी त्यांचा उपयोग करायचा होता. त्यांपैकीच एका अलीचे उद्गार प्रसिद्ध आहेत. एखादा फडतूस मुसलमानही मला गांधींच्या पेक्षा जवळचा आहे ! कारण गांधी काही झाले तरी हिंदू होते.

श्रीप्रकाशांनी विचारले असेल, ''महात्माजींची रक्षा सन्मानपूर्वक सिंधू नदीत विसर्जित करण्याची हिंदुस्थान शासनाची इच्छा आहे !''

उत्तर आले असेल, ''कोण हा महात्माजी ?''

"महात्माजी कोण ? महात्मा गांधी ! ज्यांनी विभाजन आणि स्वातंत्र्य एकदम मिळविले, पाकिस्तानलाही स्वातंत्र्य मिळवून दिले आणि उर्वरित हिंदुस्थानलाही, ते महात्मा !"

"हां हां. तो काफर ? तो हिंदूंचा पुढारी ?"

"हिंदूंचा कसा ? पुऱ्या हिंदी जनतेचे ते पुढारी होते ! आणि काफर का म्हणता? रामधूनच्या वेळी कुराणांची आयते ते हिंदूंच्या विरोधाला न जुमानता म्हणत नव्हते का ?"

"त्याने का ते हिंदू नाहीत असे सिद्ध होते काय ? तुमच्या वृत्तपत्रांच्या म्हणण्याप्रमाणे ते मरताना 'राम'का म्हणाले ? 'रहीम'का नाही ? 'या अल्लाह' का नाही ? दहन का केले ? दफन का केले नाही ?"

"तुम्ही विसरता ! ते हिंदू होते तर हिंदूंवर प्रभाव ठेवून तुमचे अधिकात अधिक हित त्यांनी केले !"

"श्रीमानजी ! आमचे हित आम्ही करून घेतले ! डायरेक्ट ॲक्शनच्या हादऱ्याने आम्ही आमचे राज्य मिळविले !"

"पण हिंदूंना प्रतिकार करू नका म्हणून गांधींनीच शिकविले ना ?"

"ज्यांनी प्रतिकार केला त्याचे काय ? तुमच्या म्हणण्याप्रमाणे गांधी सगळ्यांचे पुढारी होते ना ? ध्यानात ठेवा, हे पाकिस्तान आहे. पाक म्हणजे पवित्र. हे इस्लामी राज्य आहे म्हणून पाक आहे, पवित्र आहे. एका काफराच्या रक्षेने आम्हाला आमची नदी नापाक करायची नाही !"

"पण जगातल्या दुसऱ्या मोठ्या नद्यांत महात्माजींची रक्षा विसर्जित करण्याला त्या त्या देशांनी आनंदाने संमती दिली !"

"तिथे पाक राज्याचे आधिपत्य नव्हते म्हणून ! दफा करो !"

आम्ही आरोपी त्या दिवसांतही या चर्चा करीत होतो. आपल्याला हितकर असेल तोवर गांधींचा उदो उदो आणि काम होताच कृतघ्न बनणे ही मुस्लिम नीती हिंदुसभेच्या नेत्यांनी अनेक वेळी हिंदू जनतेच्या निदर्शनाला आणली होती. रक्षाविसर्जनाला दिलेल्या नकाराने त्या प्रवृत्तीचे पुन्हा प्रकटीकरण झाले होते इतकेच.

स्वातंत्र्य मिळाल्यावर आपल्या राज्यकर्त्यांनी आपल्या पाठीचा कणा ताठ ठेवला असता तर पहिली गोष्ट हिंदूंच्या संहाराला आळा बसला असता. शत्रूने आक्रमण करायचे आणि आपण तथाकथित उच्च तत्त्वाचा अहिंसक बचावात्मक पवित्रा घ्यायचा आणि त्या बचावात्मक पवित्र्यालाच शौर्य मानायचे या आत्मघातकी प्रवृत्तीतून आपण बाहेर आलो असतो तर आपण आक्रमण थांबविण्याचा साधा, सोपा आणि लघु मार्ग अवलंबिला असता, प्रत्याक्रमण ! आक्रमणाला पुरून उरेल इतके !

गांधींना मारण्याचा विचारच उद्‌भवला नसता ! युवकांची हीच प्रवृत्ती, हीच शक्ती 'जिवाची देवाण करण्यास, त्या प्रत्याक्रमणाच्या अभियानात उतरली असती. हजारो नथुराम, हजारो नाना आपटे किंवा माझ्यासारखे निम्नश्रेणीचे युवकही सहस्रासहस्राच्या संख्येने अग्रेसर झाले असते. सावरकरांनी वर्णन केलेल्या भविष्याला आरंभ होऊन गेला असता –

कोटि कोटि हिंदु जाति चालली रणाला !
विगता, भयहता वर्तमान काला,
ऐक भविष्याला, भव्य भीषणाला !

हा निःपात करता करताच आपण आपल्या आर्थिक स्थैर्यासाठी, वैज्ञानिक उन्नतीसाठी योजना करून त्या कार्यान्वित केल्या असत्या !

शत्रुत्व गांधींशी नव्हते, हिंदुत्वविरोधी वर्तनाशी होते आणि पाकिस्तानचे शत्रुत्व उभ्या हिंदुत्वाशीच होते !

विचार येई, निदान आता तरी शासनाने पाकिस्तानच्या त्या नकाराचा अपमान मानला पाहिजे ! रक्षेचा अंश ठेवला पाहिजे, आम्ही ज्याला राष्ट्रपुरुष मानले त्याचा तुम्ही अपमान केला आहात. जी सिंधू नदी नापाक होईल म्हणून म्हणता, ती सिंधू नदी इस्लामीकरणामुळे आज नापाक आहे, असे आम्ही मानतो. आम्ही ती नदी आमच्या अधीन घेऊ आणि आमच्या राष्ट्रपुरुषाच्या अस्थिविसर्जनाने ती पुन्हा पुनीत करू !

हिंदुत्वाची भावना नाही म्हणावे तर शासनाने गांधींच्या रक्षेचे हिंदू पद्धतीने प्रदर्शन करूनच हिंदूंच्या पूर्वापार धार्मिक भावनांचे भांडवल केले होते ! त्र्यंबकेश्वर काय, प्रयाग काय, हरद्वार काय किंवा हिंदुस्थानातल्या हिंदू मंत्रांतल्या दुसऱ्या सर्व

पवित्र नद्या काय, तेथे तेथे त्यांनी अस्थीचे सन्मानपूर्वक विसर्जन केले, हिंदू भावनांचा लाभ घेतला. कोण्या शासकीय वास्तूच्या उद्घाटनाला नारळ, फुले, कुंकू या वास्तू पाहताच आजकालचे बहुगुणा निधर्मीपणाच्या अभिनिवेशाने संतापून जातात हे आपणास ठाऊक आहे. विद्यार्थ्यांवर विशेषतः बालमनावर आणि त्यातल्या त्यात हिंदू बालमनावर, धार्मिक संस्कार होऊ नयेत म्हणून अक्षराच्या ओळखीसाठी असणाऱ्या गणपतीचे उच्चाटन करून तेथे गध्याची प्राणप्रतिष्ठा करणारे त्या काळातले विद्रूपवादी किंवा कोणी समकालीन बहुगुणा ओरडले नाहीत, ''अरे हा काय खेळखंडोबा चालवला आहात तुम्ही ? निधर्मी गांधींचा हिंदू पद्धतीने व्यापार ? हा तर राजकीय भ्रष्टाचार आहे ! गांधींचा अपमान आहे!''

माना न माना, राष्ट्र भावनांवर चालते. फार काय, भूक हा प्रश्न मुख्य असे मानणारेही हिंदू भावनांना आवाहन करतात ! म्हणून हिंदू भावनांचा जर गांधींच्या उदो उदोसाठी वापर करायचा तर त्याच भावनांना आवाहन करून हे हिंदुराष्ट्र घोषित करण्यास वेळ तो काय लागणार होता ?

आम्हाला दिवास्वप्ने पडायची. शासन आम्हाला सांगत आहे, ''फाशीची सिद्धता आहे ना तुमची ? ही शस्त्रे घ्या. तरुण मिळवा आणि पाकिस्तानने जसे सैनिकांनाच साधे नागरिक म्हणून काश्मीरमध्ये घुसविले तसे तुम्ही खरोखरीचे नागरिक पाकिस्तानच्या सीमेत घुसा. हलकल्लोळ करा. त्या अभियानात विजय मिळेपर्यंत परत येऊ नका ! मिळणाऱ्या शिक्षेतूनही तुमची सुटका होणार नाही.''

प्राणभयाने नव्हे, मान सोडवून घेण्याच्या मोहाने नव्हे, तर काय व्हायला पाहिजे या मनाच्या तरंगातून ही स्वप्ने तरळत.

पण त्या दिवास्वप्नातून आम्हाला भूतलावर आणणारा विवेकाचा उताराही आमच्या संग्रही होता. आमच्यासारखे अनेक जण नष्ट झाले तरी हिंदुस्थान काही अगतिक राहणार नाही. तेच कार्य करायला दुसरे समर्थ हात पुढे सरसावतील.

पडले शत शत मत्सम तरि का
अगतिक असेल भारत हा ।
श्रीकृष्ण सारथी यद् रथ हाकाया
सदा उभा रत हा !

''जेव्हा सिंधू नदी हिंदुस्थानच्या ध्वजाखाली येईल तेव्हा माझी रक्षा सिंधू नदीत विसर्जित करा.'' या नथुरामच्या मृत्युपत्रातील भावनेचा उगम पाकिस्तानने केलेल्या या राष्ट्रीय अपमानातून झाला !

गांधींच्या हिंदुत्वविरोधी वर्तनासाठी आम्ही त्यांना मारले असेल पण पाकिस्तानने गांधी हिंदू म्हणून त्यांचा अपमान केला होता, तो पुऱ्या राष्ट्राचा अपमान होता. राष्ट्राचा मान अपमान यावर तर आमचे प्राण जीवनमरणाच्या सेतूवर रेंगाळत होते. शासनाने त्या अपमानाची नोंद घेतली नसेल. म्हणून हिंदू जनतेने ती नोंद घेऊ नये असे थोडेच आहे ! शासन सदाच भ्रांतवादी राहील, हिंदुहितविरोधी राहील, हिंदुत्वद्वेष्टे राहील असे कोणी सांगितले ? स्थित्यंतरे होत जातात. कधी प्रतिकूल असतील तर कधी अनुकूलही. ती संधी येताच हिंदुत्वाच्या भावनेला नुसते आवाहन करण्याचा अवकाश आहे की, हे हिंदुराष्ट्र म्हणून आपोआपच अस्तित्वात येईल ! आणि तेव्हा परकीयांनी हिंदुस्थानचे जे जे भाग आपल्या टाचेखाली ठेवले ते सर्वच्या सर्व हिंदुस्थानास जोडता येतील.

+++

११ डॉ. परचुरे यांचे नागरिकत्व

गांधीवध अभियोगात ग्वाल्हेरचे डॉक्टर दत्तात्रय सदाशिव परचुरे एक आरोपी होते. त्यांनी छरिका दिली म्हणजे पिस्तूल दिले आणि ते गांधींना मारण्यासाठी दिले म्हणून तेही अन्य आरोपींना सहयोग देण्याच्या अपराधाने आरोपी होते.

डॉक्टरांनी प्रारंभीच एक विधान केले होते. मला आरोप मान्य नाही; मी ग्वाल्हेरचा नागरिक आहे.

दि. ३0 जानेवारी १९४८ पर्यंत ग्वाल्हेर संस्थान हिंदुस्थानात विलीन झाले नव्हते. ओघानेच पूर्वीच्या विधीप्रमाणे संस्थानांतून इंग्रजी राज्यात (खालसा राज्यात) अभियोगासाठी कोणी आरोपी आणावयाचा झाल्यास त्यासाठी वैध अनुज्ञा सीमापार अधिपत्र–एक्स्ट्राडिशन–वॉरंट हे सर्व सोपस्कार आवश्यक होते.

शासनाला सीमापार अधिपत्र दाखविता येत नव्हते. तसा नियमच नाही असेही विधान करता येणार नव्हते. त्यांनी एक पर्याय शोधला तो हा की, डॉक्टर मूलतः ब्रिटिश हिंदुस्थानचे नागरिक आहेत हे सिद्ध करणे.

कोण्या व्यक्तीच्या जन्माचे वेळी त्याचे वडील जर ब्रिटिश राज्यातील नागरिक असतील तर ती जन्मलेली व्यक्ती ब्रिटिश राज्याची नागरिक मानली जाते.

डॉक्टरांचे वडील मूलतः पुण्याचे. त्यांच्या पूर्वीच्या पिढ्याही पुण्याच्याच. वडील पुण्याचे हे सिद्ध करण्यासाठी शाळेतील अभिलेख, महाविद्यालयातील

अभिलेख, जिल्हाधिकाऱ्यांकडील नोंदी आणि ज्योतिषांनी केलेल्या जन्मपत्रिका हे सर्व कागदपत्र अभियोजकांनी न्यायालयाला प्रस्तुत केले.

त्या जन्मपत्रिकातून डॉक्टरांच्या वडिलांच्या आजोबा-पणजोबापर्यंतचा संदर्भ न्यायालयासमोर येई. ऐंशी-नव्वद किंवा शंभर वर्षांपूर्वीचाही उल्लेख होई. एरव्ही नीरस वाटणाऱ्या साक्षीपुराव्यात या नावीन्यानेच एक कुतूहल निर्माण होऊन करमणूक होई.

सदाशिव गोपाळ परचुरे वडील, गोपाळ कृष्ण परचुरे आजोबा, कृष्णाजी परचुरे अशी वंशावळी न्यायालयात उलगडली जात होती.

आरक्षी अधिकाऱ्यांचा परिचय नेहमीचाच होता. तेही आमच्याशी थट्टा-विनोद करीत आणि त्यात सहभागीही होत. डॉक्टरांना देऊळकर अधिकारी म्हणाले, ''डॉक्टर, समजा हे कृष्णाजीपंत अस्तित्वातच आले नसते तर एवढा खटाटोप वाचला असता नाही ?

डॉक्टरांनी लगेच उत्तर दिले, ''तुम्ही म्हणता ते बरोबर आहे ! पण त्या स्थितीत पोरबंदरला कोणी करमचंदही अस्तित्वात आले नसते !''

डॉक्टरांविषयी या पुराव्याच्या बळकटीसाठी स्वा. सावरकर यांच्या मार्सेलिसच्या उडीचाही संदर्भ आला. फ्रान्सच्या भूमीवरून सावरकरांना बळाने आपल्या स्वाधीन घेतले होते त्यावर हेगच्या न्यायालयात सावरकरांच्या वतीने आवेदन दिलेले होते. त्याचा निर्यय सावरकरांना प्रतिकूल लागला होता. न्यायालयीन संदर्भासाठी (केस लॉ) तो नोंदलाही गेला होता. तेवढाच एकमेव निर्णय.

मार्सेलिसच्या उडीचे पुन्हा स्मरण झाले होते. जवळ जवळ चाळीस वर्षांनी सावरकर स्वतः ज्या अभियोगात आरोपी म्हणून आहेत त्याच अभियोगात तो संदर्भ आलेला होता !

त्या अनुषंगाने मी सावरकरांना विचारले होते, ''तात्या, अभिनव भारताचे आणखी लोक तुम्हाला घेऊन गेले असते असे तर्क आहेत ते कितपत योग्य आहेत ?''

तात्यांनी सांगितले, ''फ्रान्समध्येही अभिनव भारताचे पुष्कळ लोक होते. पण मला ज्या नौकेतून नेले जात होते ती नौका, किंवा नौकेची फ्रान्समध्ये पोहोचण्याची वेळ यासंबंधी ते अंधारातच असले पाहिजे. बरे अशीही शक्ती त्यावेळी एकवटलेली नव्हती की नौकेवरच आक्रमण करून मला मुक्त करायचे.''

तात्या पुढे म्हणाले, ''शक्यता एकच होती. मला वाहन मिळाले असते तर मी सरळ फ्रान्सच्या आरक्षींच्या मुख्य ठाण्यावर गेलो असतो. त्या स्थितीत ब्रिटिशांना मला पुन्हा स्वाधीन घेणे फार अवघड झाले असते. लगेच घेऊन जाणे तर शक्यच नव्हते !''

''तुम्ही फ्रान्सचे नागरिक म्हणून मानले गेले असते ? तसा विधी होता ?''

''फ्रान्सचा आश्रयार्थी. नियम तर इतका होता की, समुद्रात असतानाच मी फ्रान्सच्या त्या भिंतीला शिवलो आणि पुन्हा समुद्रात जरी राहिलो तरी माझ्या इच्छेविरुद्ध ब्रिटिशांना मला घेता आले नसते.''

''तात्या, बोट आणि धक्का यात अंतर किती होते ?''

''तसे सरळ रेषेत दोन-तीन मिनिटे लागतील एवढेच. मला पाच-सात मिनिटे लागली. संभाव्य मारा चुकविण्याचा प्रयत्न होता. भिंतीशी पोहोचताच एक-दोन प्रयत्नातच मी धक्क्यावर जाऊ शकलो.''

डॉक्टर परचुरे यांना ब्रिटिश नागरिक मानले गेले. त्यांच्यावरील आरोप सिद्ध मानला गेला. श्री. आत्मचरण यांनी त्यांना जन्मठेप दिली.

डॉक्टरांनी दिलेली स्वीकारोक्ती श्री. आत्मचरण यांनी ग्राह्य धरली होती. उच्च न्यायालयाने ती स्वीकारोक्ती अग्राह्य मानली. एरव्हीही त्यातील विधानांना विश्वसनीय साक्षी नव्हत्या. म्हणून पिस्तूल ग्वालेरहून आणले गेले हे गृहीत धरूनही डॉक्टरांची मुक्तता केली गेली. नागरिकत्वाचा त्यांनी प्रश्नच हाताळला नाही. न बोलताच हे ग्राह्य धरले की, ते ब्रिटिश नागरिक आहेत आणि म्हणून या न्यायालयालाही त्यांच्या अभियोगाचा निर्णय करण्याचा अधिकार आहे.

डॉक्टर परचुरे यांच्या पूर्वपीठिकेच्या उत्खननाच्या प्रयत्नावरून एक गोष्ट आज माझ्या मनात येते. गांधीजी ही व्यक्ती महत्त्वाची म्हणून त्यांचा मृत्यूही

महत्त्वाचा. ओघानेच त्या अनैसर्गिक मृत्यूशी संबंधित प्रत्येक व्यक्तीचा छडा लावणे आणि अपराध पदरात घालणे हे शासनाने कर्तव्यच मानले त्यात अयोग्य काहीच नव्हते.

आजची आसामची समस्या या नागरिकत्वाच्या प्रश्नावरूनच उभी राहिली आहे. विभाजनपूर्व सादुल्ला मंत्रिमंडळापासून आसाम मुस्लिम बहुसंख्याक करण्याची योजना होती. बंगाल आणि आसाम मिळून लोकसंख्येचे गणन घेऊन पूर्व पाकिस्तान निर्माण करण्याचा अधिकाराधिष्ठित मुस्लिमांचा प्रयत्न होता. पाकिस्तानमधील 'पी' पंजाबसाठी, 'ए' असामसाठी आणि 'के' काश्मीरसाठी म्हणून प्रचारिले गेले.

वर्ष १९४६ च्या आधीपासून बंगालमधून–पूर्व बंगालमधून–मोठ्या संख्येने मुसलमानांची आवक वसाहती करण्याच्या दृष्टीने चालू झाली होती. मुसलमानांची ही घुसपैठ नीती लक्षात घेऊनच स्वा. सावरकरांनी १९४६ मध्ये गोपीनाथ बारडोलाई या मुख्य मंत्र्याला तार करून आसाममधून प्रत्येक मुसलमानास हुसकावून लावण्यास सांगितले होते. त्याचा तात्पुरता परिणाम म्हणून आवक थांबविली गेली होती. पण मुसलमानांना हुसकावून लावण्यास नेहरूंचा विरोध होता.

विभाजनानंतर हिंदूंची आवक मोठ्या प्रमाणात चालू झाली ती मुख्यतया त्रिपुरा, आसाम आणि बंगाल (पश्चिम बंगाल) मध्ये. संहाराने आणि लूटमारीनेही हिंदूंना जिणे असह्य केले गेल्याने आणि हिंदूंची हिंदू म्हणून राहण्याची इच्छा असल्याने ते निर्वासित म्हणून हिंदुस्थानात आले. या उलट आपल्या शासनाच्या आत्मघातकी सेक्युलर वर्तनाचा लाभ घेऊन मुसलमानांचीही आवक वर्ष १९५१ पासून मोठ्या प्रमाणात आसाममध्ये वसाहती करण्याच्या हेतूने चालू झाली. सीमेवरील जिल्ह्यांतून नागरिकांचे जे गणन होईल ते आज अस्तित्वात असलेल्या लोकांच्या आधारावर केले तर ते जिल्हे मुस्लिम बहुसंख्य झालेले दिसतील.

आणि हिंदूंतील जातीजमातींना आपण हिंदू नाही असे म्हणण्याची शिकवण दिली गेल्याने पुऱ्या आसाममध्ये हिंदू या नावाने नोंदली जाणारी जनसंख्या अल्पमतात गेली तरीही नवल वाटणार नाही.

विभाजनानंतर आसाममध्ये जे जे मुस्लिम मंत्री आले त्यांनी त्यांनी पूर्व पाकिस्तानातून मुस्लिमांच्या आयातीला प्रोत्साहन दिले, साहाय्य केले, आपल्याला-मुस्लिमांची मते मिळत आहेत या स्वार्थी भावनेने सत्तारूढ पक्षाने त्या अराष्ट्रीय घुसखोरीची उपेक्षा केली.

आलेले मुस्लिम स्वतःला बांगला भाषी म्हणवत नव्हते. पूर्व पाकिस्तानमधून आलेले हिंदू बांगला भाषी म्हणजे बंगाली आणि आसामी असा हिंदूंमध्येच प्रथमतः कलह लावून देऊन मुसलमान घुसपैठ सुरक्षित राहिले.

राष्ट्राच्या एकत्वाचा आणि अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाल्यावर आसाममधील घुसखोरांची कुळी बघून त्यांना हुसकावून लावणे हेच राष्ट्ररक्षणाच्या दृष्टीने शासनाचे कर्तव्य ठरते. नाहीतर हिंदुस्थान पादाक्रांत करण्यात मुसलमानांना श्रम असे काहीच पडणार नाहीत. विभाजनानंतर त्यांच्या घोषणा होत्या 'हसके लिया पाकिस्तान लडके लेंगे हिंदुस्थान!' पण हिंदुस्थानचाच निधर्मवाद त्यांना साहाय्यभूत होत असल्याने त्यांची त्यावेळची घोषणाही अनावश्यक ठरेल. 'हसके लिया पाकिस्तान, घुसके लिया हिंदुस्थान' असे ते उद्या म्हणतील. बरे त्यांना प्रत्येक ठिकाणी अशी घुसपैठ करायला पाहिजे असेही नाही. विभाजनानंतर कोठे तीन किंवा चार मुसलमान लोकसभासदस्य असायचे ते आता हिंदूंच्या प्रोत्साहनाने आणि आम्ही निधर्मी आहोत अशी स्वर्धा सर्वच सत्ताधारी पक्षांत लागली असल्याने त्यांच्या सहकार्याने बेचाळीसपर्यंत गेले आहेत. उरलेले हिंदू आहेत का ? त्यांतले कित्येक स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यास अपमान मानणारे आहेत ! आणि जे स्वतःला हिंदू म्हणवीतात ते धार्मिक हिंदू आहेत, राष्ट्रीय नव्हेत!

नागरित्वाच्या आधारावरील आसामचा प्रश्न त्याच निकषाने सोडविला पाहिजे ज्या निकषाने डॉ. परचुरे यांचे नागरिकत्व सिद्ध केले गेले.

+++

१२ व्यासपीठाचा स्वामी

आरोपींची निवेदने होऊन गेली होती. तुम्हाला बचावासाठी साक्षी देण्याच्या आहेत काय असा प्रश्न न्यायाधीश आत्मचरण यांनी प्रत्येकाला विचारला होता. सर्व आरोपींनी नाही असे उत्तर दिले होते.

त्यानंतर युक्तिवाद मांडले जाणार होते. आधी अभियोजक. साक्षीपुरावे गृहीत धरता तसेच अभियुक्तांची वक्तव्ये लक्षात घेता कोणाकोणावर आरोप संशयातीतपणे सिद्ध झाले आहेत हे त्यांनी मांडायचे. याउलट साक्षीपुरावे आणि आरोपींची निवेदने विचारात घेता आरोप कसे निराधार आहेत हे आरोपींच्या वतीने बचावात्मक युक्तिवाद व्हायचे.

नथुराम याला स्वतःच युक्तिवाद मांडायची फार इच्छा होती. प्रश्न तसा सोपा नव्हता. फार अरुंद वाटेवर समतोल राखण्याचा होता.

स्वतःविषयी प्रश्न नव्हता. आरोप स्वीकारला होता. पण तो होता तीनशे दोनचा. कटाचा आरोप स्वीकारलेला नव्हता.

युक्तिवाद करताना आणखी आरोपींच्या संबंधातील विधानांत त्यांनी दिलेल्या निवेदनाशी सुसंगती सांभाळण्याची होती. त्याही संबंधांतली सयुक्तिक स्पष्टीकरणे देण्याची होती.

या व्यतिरिक्त न्यायाधीशांनी विचारलेल्या प्रश्नांनाही समर्पक उत्तरे नोंदल्या गेलेल्या पुराव्यावरून देण्याची होती. नथुरामने जेव्हा स्वतः युक्तिवाद मांडण्याची

इच्छा आपल्या विधिज्ञमंडळापुढे व्यक्त केली तेव्हा या गोष्टींचा त्यांना विचार करून निर्णय द्यावयाचा होता.

श्री. ओक हे नथुराम याचे विधिज्ञ होते. त्यांना नथुरामच्या क्षमतेची कल्पना असण्याचे कारण नव्हते.

कै. अण्णाराव भोपटकर यांना नथुराम किती समर्थ होता याची जाणीव होती. आठवणी प्रसिद्ध करणारे श्री. बापट यांनी प्रसन्न होउन त्या आठवणींचा एक संच नथुरामला समारंभपूर्वक सप्रेम भेट म्हणून दिला होता.

सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये नथुराम याची स्वा. सावरकर यांचे काव्य आणि रसग्रहण याच विषयावर तीन दिवस भाषणे झाली होती. अतिशय उत्कृष्ट भाषणातील ती भाषणे होती. विषयाची संगतवार मांडणी, काव्यांतील सौंदर्यस्थले, त्यातील श्लेष, श्लेषांसाठी योजलेले संदर्भ इत्यादी विषय वक्तृत्वपूर्ण भाषेत मांडण्याची त्याची कला होती. असे कितीतरी प्रसंग होते.

मीही नथुरामाची अनेक भाषणे ऐकली होती. सांगलीला तर तो बौद्धिक कार्यवाह म्हणून काम करीत असल्याने ते प्रसंग वरचेवर येत.

एकदा त्या लाल किल्ल्यातील बंदीगृहात नथुराम स्वतःच त्याच्या भाषणकलेच्या प्रारंभाची घटना सांगत होता. घटना कसली! तो प्रसंग होता.

त्यावेळी इंग्रजी शाळांतून वाद-विवाद किंवा चर्चा किंवा संभाषण यांसाठी डिबेटिंग म्हणून एक विषय नव्यानेच चालू केला होता. नथुराम त्यावेळी तिसरीत किंवा चौथीत होता.

एक साधासा विषय दिला होता. 'मी केलेला प्रवास'. चाळीस मिनिटांत सहा विद्यार्थ्यांनी पाच पाच मिनिटे बोलायचे. शिक्षकांनी आपल्यासाठी दहा मिनिटे ठेवली.

नथुरामचा तिसरा क्रम होता. दोन विद्यार्थ्यांची भाषणे झाल्यावर तो उभा राहिला. तो त्याचा पहिलाच प्रसंग.

शिकविल्याप्रमाणे तो म्हणाला "अध्यक्ष महाराज आणि मित्रांनो"-सेकंदा मागून सेकंद निघून जाऊ लागले. तो तसाच उभा होता. त्याने जो प्रवास सांगायचा म्हणून मनात योजले होते तो मेंदूतच गरगर फिरत होता. कुठून आरंभ करायचा,

काय सांगायचे हे काही त्याला उमगेना. दहा पंधरा सेकंद गेल्यावर मुले अधीर झाली आणि हसू लागली. शिक्षकांनी मुलांकडे थांबा अशी खूण केली. आणखी पंधरा सेकंद जाऊ दिले. ''बोल, बोल, तू कुठे गेला होतास ते सांग.'' शिक्षकांनी नथुरामला सूचनात्मक संकेत दिला. नथुराम ती सूचना, तो धीर घेण्यापलीकडे जाऊन पोहोचला होता. तो भ्याला होता. विद्यार्थ्यांनी थडाथड बाके वाजविण्यासही आरंभ केला होता. नाही अशी मान शिक्षकांकडे वेळावून तो सरळ आपल्या बाकावर जाऊन बसला.

इतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. शिक्षकांनीही समारोप केला. सभाधीटपणा अंगी यावा म्हणून हा अभ्यासक्रम आहे, असे नथुरामचे उदाहरण देऊन त्यांनी सांगितले. पुढील आठवड्याचा विषय दिला 'प्रवासाचे लाभ',

विद्यार्थ्यांत नथुराम थट्टेचा विषय होऊन गेला!

पुन्हा डिबेटिंगचा तास आला. शिक्षक आले. त्यांनी विषयाची आठवण दिली. विद्यार्थ्यांची नावे सांगितली.

नथुराम उभा राहिला. ''सर, मलाही बोलू द्या!'' त्याने ते विचारायचा अवकाश की वर्गात एकच हास्यकल्लोळ उठला. नथुरामला ते बहुधा अपेक्षित होते. शिक्षकांना वाटले की याला पुन्हा संधी द्यावी. त्यांनी एक प्रश्न केला ''आजचा विषय वेगळा आहे नथुराम!''

''मी आजच्या विषयावर बोलेन!'' नथुरामने उत्तर दिले.

''ठीक आहे. आजच्या मुलांची पाळी झाली की तुझी पाळी.''

त्या वयात पाच मिनिटे बोलणे म्हणजे कितीतरी वेळ वाटतो. नवशिक्या विद्यार्थ्यांचे बोलणे कधी दोन मिनिटांत तर कधी तीन मिनिटांतही आटोपायचे.

त्या दिवशीचे सर्व विद्यार्थी संपले. सर्वांची भाषणे झाली. नथुरामची पाळी आली. पुन्हा हलकीशी हास्यलहर पसरली.

नथुरामने प्रारंभ केला. प्रवासाचे लाभ सांगितले. आणि विशेष म्हणजे प्रत्येक विद्यार्थी जे बोलला त्याचा त्याचा त्याने आपल्या भाषणात त्याच्या संदर्भासहित उल्लेख केला.

प्रथम प्रथम त्याचे भाषण हा कसचा बोलणार या भावनेने ऐकू बघणारे विद्यार्थी मिनिटा दोन मिनिटांतच गोडीने ऐकू लागले.

नथुरामची भीती मोडली होती. मुख्य म्हणजे गेल्या आठवड्यात त्याची झालेली दुरवस्था धुऊन काढल्याचे समाधान त्याला मिळाले. भाषण करण्याचा त्याचा तो प्रारंभ होता. तेथून त्याला आत्मविश्वास निर्माण झाला.

कै. आण्णाराव भोपटकर यांनी नथुरामची अनेक भाषणे ऐकली होती. अनेक वेळी ते अध्यक्ष आणि नथुराम एक वक्ता असेही योग आले होते. नथुरामची इतर समर्थताही ते ओळखत होते. त्यांना इतर विधिज्ञांना पटवायचे होते की त्यांच्या पक्षकाराच्या (आरोपीच्या) हिताला नथुरामच्या स्वतः युक्तिवाद करण्याने बाध येणार नाही.

विधिज्ञ मंडळींनी आपापसांत चर्चा केली. नथुराम यास त्यांचे वक्तव्य करू द्यावे असा निर्णय झाला.

नथुराम याने समर्थपणे आपले अभिवक्तव्य केले होते. एका दिवसाचे काम संपले होते. सर्व विधिज्ञ मंडळींनी त्याची प्रशंसा केली.

आम्ही बंदीगृहात परतलो. आम्हा सर्वांच्याच मुद्रेवर प्रसन्नतेचे भाव होते. चहा घेता घेता तो विषय चालला होता. नथुराम याने सांगितले, या मंडळींना तशी कल्पना नव्हती. कल्पना असावयाचा प्रसंगही आला नाही. म्हणून त्यांना ठाऊक नव्हते 'व्यासपीठाचा मी स्वामी आहे!'

न्यायमूर्ती आत्मचरण यांच्या समोर दुसऱ्या दिवशी नथुरामने आपले अभिवक्तव्य पुरे केले. सर्व श्रोतागण आपल्याचे खेचून घेऊन, स्वतः भावनावश न होता भावनांच्या कल्लोळात त्यांना न्हाऊ घालून त्याने आपल्या आत्मविश्वासाची प्रचीती दिली होती की तो व्यासपीठाचा स्वामी आहे!

+++

१३ झरणी

नथुरामला अटक केली त्या वेळी त्याच्या जवळ जे कपडे आणि इतर वस्तू होत्या त्याची नोंद करून आरक्षींनी वस्तू त्यांच्या स्वाधीन ठेवल्या होत्या. न्यायालयात आवश्यक पुरावा म्हणून असलेल्या वस्तूंची न्यायालयात नोंद झाली होती. इतर वस्तू नथुरामला परत दिल्या जाव्यात असा आदेश न्यायालयाने दिला.

एक आरक्षी अधिकारी त्या वस्तू नथुरामकडे घेऊन आला. पाच सहा वस्तू होत्या. त्यांत एक झरणी होती.

परत आणलेली झरणी नथुरामची नव्हती. त्याची पार्कर-५१ झरणी होती. त्याचे मूल्य त्या काळात पन्नास रुपयांच्या जवळपास असे. त्या ठिकाणी एक साधी तीन चार रुपयांची झरणी ठेवली गेली होती.

नथुरामने त्या अधिकाऱ्यांना सांगितले, ही झरणी माझी नव्हे. ही मूळची नोंद बघा. यातही पार्कर-५१ असे लिहिलेले आहे.

ज्या अधिकाऱ्याने झडती घेऊन वस्तू स्वतःजवळ ठेवल्या तो अधिकारी तो नव्हता. त्याने चौकशी करून झरणीचा तपास लावतो असे सांगितले.

झरणीचा तपास लागला नाही. शेवटी उत्तरदायित्व या अधिकाऱ्यानेच घेतले होते. त्यामुळे मूळची झरणी देण्यास तो उत्तरदायी होता.

तो पुनःपुन्हा विनवू लागला, ''ही गोष्ट न्यायालयाच्या निदर्शनास आणू नका! माझ्यावर ठपका येईल. तुम्ही वस्तू मिळाल्या अशी स्वाक्षरी द्या म्हणजे माझी मान सुटेल!'' नथुरामने स्वाक्षरी दिली.

ती झरणी चोंदली होती कारण पुष्कळ दिवस वापरात नव्हती आणि शाई वाळून गेली होती. ती नीट करण्याची खटपट आमच्यापैकी प्रत्येकाने केली. ती उघडेना!

करकरे यांनी उपाय सांगितला, ''नळी सांध्यावर तापवू या.''

पहारेकऱ्याला सांगून काड्याची पेटी आणवली. त्याने ती चोरून आणून दिली.

झरणीचा सांधा तापविण्याची क्रिया चालू झाली. थोडे तापवावे, उघडते का बघावे, उघडत नसल्यास पुन्हा तापवावे, या क्रियेत एकदा त्या नळीला पुरेशी उष्णता मिळाली.

पण ती इतकी जास्त झाली की क्षणभरात त्या नळीने पेट घेतला आणि खोलीभर काळाकाळा धूर झाला !

पहारेकरी घाबरला ! काय झाले, काय झाले म्हणून तो डोकावून बघू लागला. तेवढ्यात बंदिपाल आले तर ? पण सुदैवाने कोणी आले नव्हते !

आम्हा सर्वांनाच मरीना हॉटेल मधल्या प्रसंगाची आठवण झाली. गन कॉटन स्लॅबला–स्फोटक विटेला–लावण्याची बत्ती एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जळण्यास किती वेळ लागला ही परीक्षा बघण्यासाठी आठदहा फूट लांबीची बत्ती नहाणी घरात पेटवली. त्यायोगे असाच काळा धूर खोलीभर झाला होता! खोली लावून घेतल्याने घशात धूर जाऊन मोठ्यामोठ्याने खोकला येऊ लागला! हॉटेलचा सेवक आला तर पंचाईत होईल ही तेव्हाची भीती होती!

झरणी मिळाली असे लिहून दिल्याने पार्कर झरणी नथुरामला मिळणार नव्हती आणि मिळालेल्या झरणीची राख झाल्याने तिचा उपयोगही त्यांच्या दैवी नव्हता!

+++

१४ मारणे चांगले नाही, नथुराम

बंदिपाल भगतराम सकाळी नऊ वाजता आमच्या खोलीपाशी आले. पंधरा मिनिटांत कार्यालयात या असे त्यांनी नथुरामला आणि मला सांगितले.

‘‘कोणी भेटायला आले आहे ?’’ मी विचारले.

‘‘नाही! सहज गप्पा मारायला.’’ ते म्हणाले. ‘‘आज रविवार आहे. न्यायालयात जायचे नाही, काही नाही!’’

‘‘बरे आहे’’ असे आम्ही सांगितले. कार्यालयात बोलवण्यासाठी बंदिपाल स्वतः सहसा येत नसत. निरोप पाठवीत. आज बहुधा त्यांनाही मोकळा वेळ होता.

आम्ही कार्यालयात पोहोचलो. ‘‘हे माझे मित्र भत्रा. आरक्षी अधीक्षक (पोलिस सुपरिंटेंडेंट) आहेत. तुम्हाला भेटायचे आहे’’ असे म्हणाले.

नमस्कार झाले. आमचा परिचय झाला.

‘‘आपण कुठे असता ?’’ नथुरामने विचारले.

‘‘इथे नाही. दुसरीकडे असतो.’’ आपले ठिकाण गुप्त ठेवून भत्रा म्हणाले. त्यांना खणण्याचे कारण नव्हते. त्यांनी बोलणे चालू केले. ‘‘नथुरामजी, मारणे चांगले नाही, नाही का ?’’

सौम्य शब्दांत भत्रांनी आपला निषेध नोंदविला. स्पष्टच होते, त्यांना चर्चा करायची होती.

नथुरामच्च्या अनेकांशी चर्चा होऊन गेल्या होत्या. मारणे चांगले नाही या विधानामागील कारणमीमांसेचे गट त्याला कंठस्थ झाले होते.

प्रश्नाला प्रत्यक्ष उत्तर न देता नथुरामने विचारले, ''आपण, मला वाटते अद्याप सेवेत आहात!''

''होय!''

''वीस एक वर्षे तरी ?'' त्यांच्या वयाचा तर्क बांधून नथुरामने अनुमानतः विचारले.

''तेवीस वर्षे.''

''काही जिवावरचे प्रसंग आपल्यावरही आले असतील !''

''येतात अधून मधून.''

''माझ्याशी चर्चा करायची आहे आपल्याला ?''

थोडेसे हसून भत्रा म्हणाले, ''त्याच हेतूने मी आलो आहे. भगतरामजींनी कृपा केली. आपली भेट दिली.''

आमचा परिचय करून दिल्यावर भगतराम बंदिपाल बाहेर निघून गेले होते. मोकळेपणे बोलता यावे हा त्यांचा हेतू असावा.

नथुरामने भत्रांना प्रश्न केला, ''चर्चा मोकळी ?''

''अर्थात. मला आपले निवेदन घ्यायचे नाही. मी अधिकारी या नात्याने येथे नाही.''

''आपल्यावर कधी आक्रमणही झाले असेल. म्हणजे हल्ला !''

''झाला होता. पण ज्यांनी हल्ला केला त्यांचा नेम चुकला. माझ्या गोळ्या लागल्या. दोघेही मेले. एक लगेच, एक दुसऱ्या दिवशी. दोन महिन्यांपूर्वीचीच गोष्ट आहे. छापून आले होते !''

''म्हणजे तुम्ही दोघांना मारलेत ?''

''नथुरामजी, मला वाटते, तुमची तुलना मुळीच सयुक्तिक नाही ! मी जर प्रतिहल्ला केला नसता तर मी मेलो असतो. महात्माजींनी तुमच्यावर हल्ला थोडाच केला होता ?''

''भत्राजी, निष्कर्ष आपण काढू नका--इतक्यात. आपण क्रमाने जाऊ. मारणे चांगले नाही असे आपण म्हणालात.''

''म्हणजे मी ज्या परिस्थितीत दोन लोक मारले ती स्थिती वेगळी होती. मी अद्यापही म्हणतो मारणे वाईटच.''

''आता आपण सांगा, त्यांनी आपल्याला मारले असते तर तेही वाईट होते. अन् त्यांना तुम्ही मारलेत तेही वाईट होते.''

''बरोबर.''

''म्हणजेच तुम्ही त्यांना मारले नसते तर ते चांगले होते.''

जणू ते दृश्य डोळ्यांपुढे उभे आहे अशा आविर्भावात भत्रा म्हणाले, ''अहो ते शक्य नव्हते! मी आज तुमच्यांपुढे आलोच नसतो! मी पोहोचलो असतो परलोकांत! तुम्हाला ठाऊक नाही, त्यांच्या बंदुका तपासल्या त्या बंदुकांत अद्याप गोळ्या होत्या!''

''भत्राजी! या पद्धतीने आपल्या चर्चेला अंत राहणार नाही. आपल्याला कुठे तरी स्थिर व्हायला पाहिजे. परिस्थिती मी पाहिलेली नाही. आपण म्हणता त्यावर माझा अविश्वास असण्याचे काही कारण नाही. आपण मग असे का नाही म्हणत की आपण त्या दोघांना मारले हे चांगले झाले ?''

''मी एवढेच म्हणेन, मी मेलो असतो तर फार वाईट झाले असते. ते मेले हे वाईट झाले. पण त्याचा येथे संबंध कसा जोडता ?''

''संबंध कसा जोडायचा ते क्रमाक्रमाने बघू. किंबहुना संबंध जोडायचा की नाही तेही मग ठरवू. सध्या आपण येवढे मान्य करता की मारणे ही क्रिया कधी वाईट असते तर कधी फार वाईट!''

काहीसे गोंधळून भत्रा म्हणाले, ''मला शब्दांत का अडकविता ?''

नथुराम म्हणाला, ''मग आपण पुन्हा भेटू केव्हातरी. जे आपण वस्तुस्थितीवरून सांगितलेत त्याची मी व्याख्या केली. बरे तीही आपलीच. ती स्वीकारण्यालाही आपण भिता. कारण आपण पहिला प्रश्न विचारलात त्याला

आपल्याला अनुकूल उत्तर अपेक्षित आहात. असे निश्चित मत करून आलेल्याशी या विषयावर चर्चा काय करायची ?''

नथुराम उठण्याच्या सिद्धतेत आहेसे बघताच भत्रा म्हणाले, ''मला खरोखरीच तुमचे म्हणणे ऐकायचे आहे. मध्यंतरी मला प्रश्न विचारण्याची अनुज्ञा द्या.''

''बरे आहे.'' असे म्हणून नथुरामने आरंभ केला. तो म्हणाला --

''कोणतेही मारणे हे चांगले किंवा वाईट हे मारण्यामागील हेतूवर अवलंबते. मारणे हा एक धर्म नसतो. तो असतो आपद्धर्म. म्हणूनच युद्धे थोडी होतात. शांतता लांबवर टिकते.

पण आपद्धर्म कळायलाही धर्म कळावा लागतो. म्हणजेच आपद्धर्मही केव्हा धर्म होतो ते समजू शकते.

स्वार्थासाठी मारणे अशी एक क्रिया असते. ती माझ्यापेक्षा आपण अधिक जाणता. आपल्याला ती क्रिया चर्चेतही घेण्याचे कारण नाही.

केव्हा अनिवार्यपणे मारण्याचा प्रसंग येतो. एखाद्या सार्वजनिक वास्तूवर जमावाने आक्रमण केले आहे, ती वास्तू ते जाळण्याच्या प्रयत्नात आहेत अशा वेळी आपण आरक्षीगण गोळीबार करता. काही लोक त्यात मरतातही. आपण त्याचे 'अनिवार्य' म्हणून समर्थन देतो.

केव्हा आत्मरक्षणासाठी मारणे आवश्य असते. आणि आत्म याची व्याप्ती ती व्यक्ती ज्यांचा अंश आहे तो पूर्ण समाज अशी असेल तेथे सकृत दर्शनी एखादे मारणे अर्थ न लागणारे वाटले तरी ते त्या व्यापक अर्थाने आत्मरक्षणासाठी असते. त्या व्यक्तीचे स्वतःचे अस्तित्व वेळी संपलेलेही असते. त्यातून आत्मरक्षण संभवते.

आपण जी दोन माणसे मारलीत असे म्हणालात त्यात आपली भूमिका आत्मरक्षणाचीच होती. आत्मरक्षण म्हणजे केवळ आपलेच व्यक्तिगत रक्षण नव्हे.

आपली नियुक्ती समाजरक्षणासाठीच आहे. त्या सेवेच्या अनुषंगाने आपण जे करता ते समाजहितासाठी, समाजरक्षणासाठी.

मला वाटते सूत्रात मी सांगितले आहे. अपराधचिकित्सा शास्त्र-क्रिमिनॉलॉजी हा विषय आपला आहे. मी एक सामान्य माणूस त्या शास्त्राकडे कसे बघतो ते आपल्याला सांगितले.''

भत्रा यांच्या मुखावर काही समाधानाचा तर काही कौतुकाचा भाव होता. प्रश्न विचारून आणखी काही बोलण्यास लावावे असे त्यांना वाटले नाही. त्यांनी आभार मानले. पण त्या वेळात ते म्हणालेच ''नथुरामजी, गांधीजींपेक्षा जिनाला मारले असते तर ?''

नथुराम म्हणाला, ''म्हणजे आपल्या भाषेत कमी वाईट मारणे ? पण असे पहा, एक अभियान हाती घेतले तर इतके लोक दोराखाली वावरत आहेत हे आपण बघतच आहात. आपण एक काम कराल का ?''

''काय ?''

''खरोखरीच आपल्याला वाटते जिनाला मारावे म्हणून ?''

तोंडातून 'हं' असे न काढताच भत्रांनी आविर्भावाने होकार दर्शविला.

''मग आपणच केलेत ते काम तर ? आपल्यावर एक आरोप कमी लागेल.''

काहीसे भिऊनच भत्रा म्हणाले ''कोणता ?''

''अनुज्ञेवाचून पिस्तूल बाळगले हा आरोप !''

भेट संपली होती ! हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवणारे लोक थोडे नाहीत ! माझ्या मनात विचार आला !

नथुरामचे अधिवक्तव्य ऐकण्यास पुष्कळच लोक आले होते. पुरे न्यायालय भरले होतेच, अनुज्ञा मिळवून बाहेरच्या गच्चीत-गॅलरीतही लोक उभे होते.

त्याचे अधिवक्तव्य संपल्यावर क्रमाक्रमाने सर्व आरोपींच्या वतीने युक्तिवाद मांडले गेले होते. न्यायालयाला सुटी लागली होती.

एके दिवशी दुपारी नथुराम आणि मी यांना कार्यालयात बोलावले होते. वास्तविक आम्ही खोलीत बंद होतो. पण खोली उघडून आम्हाला नेले होते.

बंदिपालाच्या कार्यालयात एक सज्जन बसले होते. ते पूर्वी भेटलेले भत्राच होते.

ते उभे राहिले. आम्हा दोघांकडे त्यांनी पाहिले आणि पुढे येऊन नथुरामच्या पायांना हात लावला !

ते गहिवरले होते. त्यांना ठाऊक होते नथुराम फाशी जाणार आहे. ठाऊक होते याचा अर्थ त्यांचे ते अनुमान होते आणि ते निश्चित होते.

भत्रांनी अभिवक्तव्य ऐकले होते. पंजाब उच्च न्यायालयाचे तीन पैकी एक न्यायमूर्ती श्री. खोसला यांनी उच्च न्यायालयातील स्थितीचे वर्णन केलेले आहे, श्रोतृवर्गातील स्त्रिया हुंदके देऊन रडत होत्या तर पुरुषांचा हात स्वतःचे अश्रू पुसण्यासाठी रुमाल शोधीत होता.

लाल किल्ल्यातील या विशेष न्यायालयातील श्रोतृवर्गाची स्थिती वेगळी नव्हती ! न्यायमूर्ती आत्मचरण यांची पत्नी किंवा प्रमुख अभियोजक दफ्तरी यांची पत्नी त्या स्थितीला अपवाद नव्हत्या ! त्या अनेक श्रोत्यांत भत्रा एक होते.

स्वतःला सावरल्यावर भत्रा बसले. नथुरामला त्यांनी आपल्या शेजारच्या खुर्चीवर बसण्यास सांगितले. नथुरामच्या पाठीवर त्यांनी हात ठेवला आणि भत्रांना हुंदका आला.

नथुरामने त्यांचे सांत्वन केले. बंदिपाल तेथेच होते. त्यांनी पहारेकऱ्याला संकेत केला.

पहारेकऱ्याने पाण्याचे पेले आणून ठेवले.

भत्रा म्हणाले, ''नथुरामजी मी दोन कारणांसाठी आलो. आपले दर्शन घ्यायचे. पुन्हा योग येईलच असे नाही. आणि दुसरे कारण आपली क्षमा मागायची !''

''क्षमा कसली ?'' नथुरामने विचारले.

''मी गेल्यावेळी विचारले होते जिनाला का नाही मारलेत ? मला लाज वाटते, माझा प्रश्न बालिश होता. जिना आता मेलाच आहे तो भाग वेगळा !''

''अहो त्याचे काय वाटून घेता येवढे ? बोलण्यातला एक सहज विषय होता तो !''

''नव्हे, नथुरामजी ! तुमचे निवेदन वाचण्याचाही योग आला आणि मुख्य म्हणजे तुमचे वक्तृत्व ऐकले ! माझ्या मनातील विचारासारखा तुमच्या मनात विचार आला नसेल हेही संभवत नाही आणि संभव असाही आहे की तुमचा तसा प्रयत्नही असेल ! पण मुख्य मला सांगायचे आहे ते हे की तुम्ही मला प्रत्यक्षच प्रश्न केलात आणि क्षणभर मी तुमच्या डगल्यात मीच उभा आहे (imagined myself to have stood in your shoes) अशी कल्पना केली ! मला ती कल्पनाही असह्य होती ! आमच्या अंगावर गणवेश असतो त्या बळावर आम्ही वेळी धडाधड गोळ्या सोडतो ! त्यासाठी आम्हाला वेतन मिळते ! तुम्हाला कवचच नाही ! आम्ही मनात एकीकडे म्हणायचे जे व्हायला हवे होते ते झाले अन् दुसरीकडे तुमच्यावर आगपाखड करायची हे आमचे शौर्य ! या भोंदूगिरीत आम्ही जगतो ! आम्हाला वाटते शूर वीर निघावेत, देशभक्त निघावेत पण दुसऱ्यांच्या घरी ! आणि तसे निघाले तरीही आम्ही त्यांच्या जीवमान स्थितीत साधे कौतुक करण्याचे धाडस करू शकत नाही ! क्षमायाचना यासाठी आहे नथुरामजी !''

नथुरामने त्याचा हात आपल्या हाती घेतला. तो म्हणाला,

''मी भावना समजतो आपल्या ! आपण निश्चिंत असा ! आपण अंतःकरणाचा तळ पृष्ठभागावर आणलात, त्याचे प्रदर्शन केलेत यातच सर्व आले !''

भत्रा म्हणाले,

''एक भेट स्वीकारा. भगतरामजींनी अनुज्ञा दिली आहे.'' असे म्हणून त्यांनी कोपऱ्यातल्या करंडीकडे बोट संकेत केला.

सफरचंदाची एक करंडी त्याने आणली होती ! साठ सफरचंदे !

नथुरामने आभार मानले.

बंदिपालाने करंडी तपासली, त्याने ती खरे म्हणजे आधीच तपासली होती. आणि सात आठ सफरचंदे काढून ठेवून पहारेकऱ्याकडून ती करंडी आमच्याकडे धाडली.

दुसऱ्या दिवशी बंदिपालाने सांगितले, ठेवलेली सफरचंदे बडगे आणि शंकरकडे दिली म्हणून !

आम्हा कोणालाच त्याचे दुःख वाटले नाही !

+++

१५ सुतळीचा तुकडा

दि. १० फेब्रुवारी १९४९ ला आमच्या अभियोगाचा निर्णय दिला जाणार हे आधी प्रकट झाले होते. त्याप्रमाणे निर्णय होऊन स्वा. सावरकर बंधमुक्त झाले होते. शिक्षा झालेल्यांना बंदीगृहात धाडले गेले होते.

सावरकरांचे साहित्य सकाळीच आवरून ठेवले होते. बांधण्यासाठी दोरी नव्हती म्हणून मी म्हटले या बाजेची दोरी काढून घेऊन वळकटी बांधून ठेवतो. तात्या म्हणाले, ''इथला एक सुतळीचा तुकडाही नको! परत यायचेच असेल तर सर्वच इथले आहे!''

दुपारी सावरकरांचे साहित्य घेण्यासाठी पहारेकरी आला. त्याने पहिले वळकटी बांधलेली नव्हती. तो मला म्हणाला, ''थांबा, मी दोरी घेऊन येतो.''

तो कार्यालयांत गेला आणि तेथून चार सुतळ्या घेऊन आला ! त्याने वळकटी बांधली आणि इतर सामानांसह ती वळकटी बाहेर घेऊन गेला.

सुतळीचा तुकडाही नको हे म्हणीसाठी आपण वापरतो आणि येथे प्रत्यक्षात ती म्हणच शब्दशः फिरली होती ! तात्यांच्या सामानासह बंदीगृहाच्या सुतळीचा तुकडा गेला होता !

+++

१६ निधर्मीवादाची लागण

स्वा. सावरकर सुटल्याने आम्हा दंडितांच्या मनावरील भार उतरला होता. त्यांची हिटलर-मुसोलिनीसारखी वासलात लावण्याची नेहरूंची मनीषा फलद्रूप झाली नव्हती.

आम्ही न्यायाधीन असतानाच तथाकथित निधर्मीवादाच्या दृष्टीने काही हालचाली चालू झाल्या होत्या. सावरकरांपर्यंत त्यांतील काही तरंग कै. आण्णाराव भोपटकर पोहोचवीत असत. भोपटकर अशा मंडळींना थोपवून धरीत असत. सावरकरांसंबंधीचा निर्णय काय तो होऊ द्या. म्हणजे या विषयावर निर्णय करणे सुलभ जाईल, असे ते त्यांना सांगत.

सावरकरांची मुक्तता होईल याची भोपटकरांना निश्चिती होती. पण तसे आधी बोलणे धाडसाचे होते.

सावरकर त्या हालचालीला नुसती मानसिक चलबिचल म्हणत, मनाच्या दुबळेपणाचा अविष्कार समजत. ते भीती व्यक्त करीत की अशातूनच काही कच्चे दुवे हे काँग्रेसवाले हाताशी धरतील, त्यांना बाडगे करतील! (सावरकरांनी आपले निवेदन आत्मचरण यांच्या न्यायालयात वाचले त्यात क्षमेचा साक्षीदार बडगे याच्या नावाचा उच्चार सदा बाडगे असा केला होता!) त्यांचा कटाक्ष होता, हिंदुराष्ट्र आणि हिंदुराष्ट्रच! ते सुटणार असले तरी अन् त्यांना शिक्षा लागली तरीही! कसोटीच्या वेळी तत्त्वाला चिकटून असलेले लोक जर ताठपणे उभे राहिले

नाहीत तर त्या तत्त्वाभोवतीच्या लोकांचा अध:पात निश्चित असतो, त्या समाजाचा नाश अटळ असतो, हा त्यांचा सिद्धांत होता. त्यांचे म्हणणे, ज्यांना हिन्दुराष्ट्रवाद त्याच्या भोवती असलेल्या छळवादामुळे परवडत नाही म्हणून तुम्ही त्यागपत्रे देऊन सत्ता हिंदुत्वनिष्ठ गटाच्या स्वाधीन करा असे मी जसे काँग्रेसच्या हिंदूंना आवाहन करतो तसेच आवाहन आपल्याही मंडळींना करीन की एकीकडे हिंदुत्ववादी म्हणवून घेऊन दुसरीकडे दंभाचार करू नका.

ज्यांची मान फाशीच्या दोरात अडकवली आहे आणि ज्यांना न्यायालयाचा शब्द येऊ दे की दोर आवळतो, अशा दहशतीत इतके दिवस ठेवले आहे त्या सावरकरांची इतकी परखड, इतकी स्पष्ट मीमांसा भोपटकरांनी संबंधित व्यक्तींना पोहोचवली की त्यावर काही बोलण्याचे कोणी धाडस करीत नसे.

सावरकर सुटले त्याच वर्षी (डिसेंबर १९४९ मध्ये) कलकत्ता येथे डॉ. ना. भा. खरे यांच्या अध्यक्षतेखाली हिंदुमहासभेचे अधिवेशन झाले. त्या प्रसंगी सावरकरांनी आपल्या भाषणांत सांगितले होते, अखंड हिंदुस्थानाचे उद्दिष्ट कधी नव्हते इतके जवळ आले आहे (The goal of Akhand Hindusthan nearer than ever) आणि श्रोतृवर्गाला त्यांच्या शौर्याची जाणीव करून दिली होती. मिळालेले स्वराज्य हे तुमच्यामुळे आहे, तुम्ही सांडलेल्या रक्ताच्या थेंबागणिक स्वराज्य जवळ आले आहे. ज्यांनी येवढा मोठा हिंदुस्थान सहजपणे मिळविला आहे त्यांना उरलेला परतंत्र हिंदुस्थान हस्तगत करणे मुळीच अवघड नाही.

सावरकरांनी ते न्यायाधीन असताना व्यक्त केलेली भीती मात्र त्या पाठोपाठ आकार घेऊ लागली हे स्थित्यंतर आम्ही बंदीगृहातून बघत राहिलो होतो.

काँग्रेसला सैद्धांतिक विरोध त्या काळात (आणि नंतरही) हिंदुसभेचाच काय तो होता. म्हणून फोडा, म्हणजे फूट पाडा, आणि राज्य करा या ब्रिटिशांच्या नीतीच्या प्रयोगाचा काँग्रेसनेही अवलंब केला आणि तो त्यांना लाभदायी ठरला.

हिंदुत्वनिष्ठांमधील एक गटच्या गट हिंदुत्वाच्या सिद्धान्तापासून अलग करण्यात काँग्रेसला यश मिळाले. या गटाने, आपण हिन्दुत्वनिष्ठ आहोत, काँग्रेसचे विरोधक आहोत अशा मिषाने हिंदुसभेतील आणखी लोकांनाही ओढून आपल्या

कळपात घेतले. त्या नव्या गटाने निधर्मीपणा स्वीकारला होता. पण प्रारंभी प्रारंभी ते सांगत की आम्ही हिंदुत्वनिष्ठच आहोत. नुसते तात्पुरते धोरण म्हणून आम्ही निधर्मीवाद स्वीकारला आहे; वास्तवतेत ते नुसते नाटक आहे.

अनेक हिंदुत्ववादी या सांगण्यावर विश्वास ठेवून त्यांना जाऊन मिळाले.

काँग्रेसला अपेक्षित परिणाम होत होता. हिंदुसभेचा सैद्धांतिक विरोध काँग्रेसला होता तो जसाच्या तसाच राहिला; पण त्या सैद्धांतिक विरोधामागे उभी असलेली शक्ती क्षीण होऊ लागल्याने विरोध निष्प्रभ ठरू लागला. त्यामुळे काँग्रेसला हिंदुसभा कोणी विरोधी गट आहे हे मोजण्याचे कारणच उरले नाही. आणि हिंदू हित विरोधी गोष्टी करण्यास मोकळे रान मिळाले. हिंदुसभेचा प्रत्यक्षपणे पाडाव करण्याचे कार्य काँग्रेससाठी त्या नव्या हिंदुत्वनिष्ठ गटाने अंगावर घेतले होते. पंडित नेहरूंना हिंदुत्ववाद्यांचा पाडाव करणे जे जमले नाही ते यामुळे होऊ शकले, हे माझे निरीक्षण आहे.

'नाटक' म्हणता म्हणता आम्ही मुक्त होण्याच्या काळापर्यंत व्यवहारात आम्हाला वेगळा अनुभव आला. एके काळी ज्यांच्या समवेत राहून हिंदुराष्ट्र या ध्येयासाठी कामे केली, त्यातलेच हे नवे निधर्मी 'हिंदुत्ववादी' सावरकरांकडे, त्यांच्या अनुयायांकडे बोटे दाखवतात, अरे, तो पहा जातीय! तो पहा प्रतिगामी! तो पहा पुराणमतवादी विचारांचा !

मूळच्या काँग्रेसवाल्यांनी हिंदुसभावाद्यांना, हिंदुत्त्वनिष्ठांना जातीय म्हटले तर त्यात विसंगती वाटत नाही. त्यांची ती जन्माची खोड आहे. बाडग्यांनी हिंदुत्ववाद्यांना जातीय म्हटले तर ते त्यांच्यासाठीच ओंगळ दिसते.

+++

१७ वाटचालीचा टप्पा

वर्ष १९६४ च्या १३ ऑक्टोबरला आम्हा तिघांची-करकरे, मदनलाल आणि मी यांची जन्मठेपेतून मुक्तता झाली. १९६४ च्या २४ नोव्हेंबरला मला आणि करकरे यांना पुन्हा बंदिवासात टाकले. आमच्या मित्रमंडळींनी दि. १२-११-६४ ला आमचा सत्कार करण्यासाठी सत्यविनायकाची पूजा केली होती त्या प्रसंगी कै. ग. वि. केतकर यांनी भाषण केले होते.

कै. केतकर यांच्या व्यतिरिक्त त्या दिवशी उपस्थित असलेल्या प्रमुख ८-१० व्यक्तींनाही बंदीत टाकले होते.

शासनाचा आक्रोश काय होता तर नथुराम आणि नाना आपटे यांचे आम्ही उदात्तीकरण केले !

'गांधीहत्या आणि मी' हे पुस्तक मी त्या नंतरच्या कारावासातून वर्षभराने मुक्त झाल्यावर लिहिण्यास प्रारंभ केला. ते पुस्तक मी अतिशय जपून म्हणजे भीत भीत लिहिले. मराठी वाचक किती ग्रहण करील ? की नुसत्याच गप्पा असे म्हणून पुस्तकाची वाट लावील ? अमुक लिहिले तर पटेल का ? हे सारखे माझ्या मनात वावरत असे. सर्व हिंदुस्थानच आपला आहे ही भावना कशी ठसविता येईल ? या प्रदेशात तेथल्या लोकांचे, विभाजनाने पीडीत समुदायाचे, त्यांच्या भावनांचे दर्शन कसे घडविता येईल ? काही पिढ्यांपूर्वी हा महाराष्ट्रच उठून उत्तरेकडील नद्या ओलांडत, भूखंड पादाक्रांत करत, ठिकठिकाणच्या सुलतानांच्या

नाकात वेसण घालून त्यांना नुसते शोभेचे बैल, नंदीबैल करून ठेवून तेथल्या राजकारणावर आपले प्रभुत्व ठेवून पूर्वेला बंगालपासून पश्चिमेला पेशावरपर्यंत वावरला होता. त्यातील राष्ट्रीय एकात्मतेची भावना आजच्या पिढीला कोणत्या शब्दांत सांगावी ? तेथल्या लोकांचे आणि आपले रक्ताचे नाते कसे पटवावे ? माझ्यापरीने मी प्रयत्न केला खरा. पण त्यात सांगितलेल्या गोष्टींपेक्षा न सांगितलेल्या आणि सांगता येण्याजोग्या गोष्टी फार राहून गेल्या ! शासनाने लोकांना जे भेदरवून सोडले त्यामुळे लोक कितपत ग्रहण करतील या भयाने मीही संकोचलो होतो !

शासनाला गांधींचे-गांधींच्या नावापलीकडे कसलेच प्रेम नाही. तेव्हाही नव्हते आणि आजही नाही. पण लोकांना वस्तुस्थितीच्या ज्ञानापासून वंचित ठेवून त्यांच्या अंधश्रद्ध गांधीप्रेमाचा लाभ घेण्याचे चलनी नाणे शासन वापरते.

लोकांना आता शासनाच्या या थोतांडाची जाणीव होऊ लागली आहे. त्यामुळेच मी मागील एका आठवणीत भत्रा यांनी नथुरामला वंदन केले ही कथा सांगितली, यावर लोक आता मी नथुरामचे उदात्तीकरण केले या भावनेने न बघता तेव्हाही परिस्थिती काय होती हे कळण्याच्या दृष्टीने बघतील.

निर्णय लागल्यावर दोन अडीच महिन्यांनी आमचे लाल किल्ल्यातील वास्तव्य संपले होते. आम्ही अंबाला बंदीगृहात धाडले गेलो होतो.

त्या बंदीगृहात नथुराम आणि नाना अपटे यांना फाशी कोठीत ठेवले होते. बंदिपालाच्या किंवा अधिक्षकाच्या माध्यमातून अनेकजण त्यांच्या भेटीला येत असत.

बंदिपाल एक दिवस नथुरामकडे एक झरणी घेऊन आले. खिशातून एक वही काढून त्यांनी ती झरणी आणि वही नथुरामपुढे केली. ते म्हणाले, ''माझा एक मित्र आहे. त्याला स्वाक्षरी हवीच आहे. पण त्याची इच्छा आहे या झरणीने लेखनारंभ आपल्या हातून व्हावा.''

बंदिपालाच्या इच्छेप्रमाणे नथुरामने त्या झरणीने स्वाक्षरी करून दिली.

उदात्तीकरणासारख्या वाटणाऱ्या या घटना तेव्हा होत असत. मला स्वतःलाही असे अनुभव सर्वदूर येतात. मागे म्हटल्याप्रमाणे, शत्रुत्व गांधींचे नव्हते.

हा दोन तत्त्वज्ञानांचा वाद होता. स्थूलरूपाने, अखंड हिंदुस्थान की अखंड पाकिस्तान हा तो वाद. निधर्मीपणाच्या दंभाचाराला त्यावेळी जितका विरोध होता तितका तो आजही आहे.

आज माझ्या वयाची साठ वर्षे होऊन गेली. त्या टप्प्याची खूण म्हणूनही हे पुस्तक समजायला प्रत्यवाय नाही.

अस्मिता ठेवून जगायचे असेल तर हिंदुराष्ट्रवादावाचून तरणोपाय नाही हा विश्वास घेऊनच श्वासोच्छवास चालत आहे आणि श्वासोच्छवास बंद होणार आहे.

आजच्या वाचकवर्गाला त्या काळातील वाद कळावा म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी विभाजनाच्या वेळी दिलेली दोन संपूर्ण वक्तव्ये परिशिष्ट म्हणून दिली आहेत. आपली स्थिती आपण आपल्याच हाताने भौगोलिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या कशी संकुचित आणि परतंत्र करीत चाललो आहोत ते बघून त्याला उपाय काय हे वाचकवर्गानेच ठरविण्याचे आहे.

ही वक्तव्ये त्या काळी जशी 'मराठा' या इंग्रजी नियतकालिकात प्रसिद्ध झाली तशी ती श्री. धनंजय कीर यांनी लिहिलेल्या Historical Statements of Veer Savarkar या ग्रंथात आणि समग्र सावरकर वाङ्मय या ग्रंथातही पुनर्मुद्रित झाली आहेत.

+++

परिशिष्ट (१)

रक्तविहीन (!) विभाजनानंतर हिंदुत्वाच्या समस्या

स्वा.सावरकर यांचे पत्रक

प्रत्याक्रमण

हिंदुत्वाच्या हिताच्या दृष्टीने हे अत्यावश्यक झाले आहे की काँग्रेसी मंत्री आणि नेते, तसेच वृत्तपत्रे यांनी सामूहिकपणे गिल्ला करून धोशा धरलेली काही तत्त्वे, काही युक्तिवाद यांचा तत्काळ प्रतिकार केला पाहिजे. उदाहरणार्थ, पंडित नेहरू अलीकडे वारंवार सांगत आहेत की प्रत्याक्रमणाचा किंवा शिक्षा करण्याचा अधिकार शासनाचाच आहे, आणि लोकांनी (म्हणजे या संदर्भात हिंदू शिखांनी) तो अधिकार स्वतःच्या इच्छेने हाती घेणे कोणत्याही प्रकारे समर्थनीय ठरणार नाही! हे तत्त्व प्रतिपादन करताना पंडित नेहरू गांधींच्या भोंगळ, खोडसाळ नीतितत्त्वाचा काथ्याकूट करण्याच्या भानगडीत पडले नाहीत हे चांगले झाले. त्यांनी स्वच्छ शब्दांत सांगितले की या प्रश्नाच्या नीतितत्त्वांविषयी–मॉरल्सविषयी–ते बोलत नव्हते. तर त्या प्रश्नाच्या व्यवहार्य अंगासंबंधीच त्यांची चर्चा होती.

तेवढे तरी बरे आहे ! पण या प्रश्नाचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि तितकाच व्यवहारवादी दृष्टिकोन लक्षात घेण्यास ते सोयिस्करपणे विसरले. ज्या वेळी शासन आपल्याच लोकांचे संरक्षण करण्यास चुकारपणा करीत असेल किंवा पूर्णतया अक्षम ठरण्याइतके दुबळे होऊन गेले असेल तेव्हा लोकांनी काय करायचे ? लोकांचा, त्यांच्या निवासस्थानांचा आणि मानस्थानांचा अपमान केला गेला ! त्याच्या प्रतिशोधाची व्यवस्था शासनाने करणे दूरची गोष्ट.

आत्मसंरक्षणाचा वैध अधिकार कोणाही व्यक्तीला प्राप्त आहे. आत्मरक्षणासाठी प्रत्याक्रमण हाच उपाय असेल तर तोही वैध आहे. अत्याचारी आक्रमकाला थांबविण्यास आसपास कोणी आरक्षी नसतील किंवा आक्रमक अप्रसन्न होतील या भयाने आरक्षी त्याचा प्रतिकार करत नसतील तेव्हा व्यक्तीने आत्मरक्षण करणे आणि त्यासाठी वेळी प्रत्याक्रमणाचा उपाय योजणे हा अधिकारच आहे. हा अधिकार नागरिकाला असलाच पाहिजे.

जेव्हा राज्ययंत्रणा नावाची वस्तूच संरक्षणासाठी अस्तित्वात नव्हती आणि अशा अवस्थेत सुसंघटित भीषण शस्त्रांनी सज्ज, विद्वेषाने भारलेला क्रूर शत्रू बलात्काराने, जिवंत जाळण्याने, बलात धर्मान्तराने आणि सामूहिक हत्याकांडाने सर्व जातिविशेष नष्ट करण्याच्या पवित्र्यात होता अशा वेळी त्या सहस्रावधी हिंदुशिखांनी काय करायला हवे होते ?

पाकिस्तानने पुऱ्या पश्चिम पंजाबात मुसलमानांना शस्त्रे, दारूगोळा, विध्वंसके मुक्तहस्ताने वाटण्याचा प्रबन्ध केला. लीगच्या नेत्यांनी मुसलमानांना भडकावले की हिंदुस्थानावर झेप घेण्यासाठी पाकिस्तान केवळ उत्सल पटल (स्प्रिंगबोर्ड) आहे, नगरानगरांतून मुसलमान सहस्रांच्या संख्येने सशस्त्र होऊन भयानक उद्घोषाने संचलने करीत आहेत ''हसके लिया पाकिस्तान मारके लेंगे हिंदुस्थान.'' पाकिस्तानचा जन्मोत्सव साजरा करण्यासाठी मुस्लिम राज्य पूर्वपंजाबवर आक्रमण करण्याची व्यूहरचना करीत असताना आणि दिल्लीवरच स्वारी करण्याची योजना आखीत असताना आपले शासन, आपले दिल्लीत बसलेले मंत्रिमंडळ शत्रूचा तो संभाव्य हल्ला थांबविण्यासाठी, त्याच्या

प्रतिकारासाठी काय उपाययोजना करीत होते ? काँग्रेस मंत्रिमंडळाने पहिले पाऊल काय उचलले असेल तर ते हे की या दोन राज्यांत असला काही तणाव किंवा संघर्ष अस्तित्वातच नाही असे ठासून सांगणे आणि मातृभूमीची शकले करून रक्तपात टळला आणि रक्तहीन क्रांती केली हे डिंडिम पिटणे! या देशविभाजनाचा उत्सव डामडौलाने करण्याचा आदेश देणे!

नुसत्या दिल्लीतच पन्नास हजार मेयो मुसलमान आणि कित्येक खाकसार यांना शासनाने आश्रय दिला. त्यांनी गुप्तपणे दारूगोळा साठविला आणि आरक्षी दलात पन्नास टक्के पाळलेल्या मुसलमान आरक्षींनी, मुसलमानांच्या अधिपत्याखाली दिल्लीवरच चढाई करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला! हिंदुसंघटनवाद्यांनी आगामी संकटाची सतत आक्रोशून सूचना दिली होती. पण त्या हिंदुसंघटनवाद्यांनाच राष्ट्रद्रोही आणि जातीय म्हणून घोषित केले गेले, आणि प्रांताप्रांतात त्यांची ससेहोलपट करून त्यांना बंदीत टाकले गेले !

आपण जागृत ज्वालामुखीच्या तोंडावर आहोत. आता जल्लोश करण्यास आपणांस सवड नाही. पूर्व पंजाबच्या सीमा असुरक्षित आहेत. परिणाम असा झाला की पंधरा ऑगस्ट १९४७ च्या दोन दिवस आधीपासून हिंदूंचा क्रूर संहार केला गेला. तो नित्यक्रमच झाला. मुस्लिम प्रदेशातून अशा प्रकारे रक्तमांसाचा खच पडून हिंदुशिखांच्या रक्ताच्या नद्या वाहात असता इकडे दिल्लीत मंत्रिगण मेजवान्या झोडत होते आणि नाच करीत होते कारण त्यांना रक्तविहिन क्रांतीचा उन्माद चढला होता !

नेहरू नीरो

अशा परिस्थितीत आत्मरक्षणाच्या उपजत भावनेने भारले जाऊन आणि अखिल हिंदू एकता तत्त्व जागृत होऊन लक्षावधी हिंदू-शिखांनी पूर्व पंजाब, भरतपूर अलवार, पतियाळा आणि दिल्लीतही आपली शक्ती आणि साधने एकवटून आणि पणाला लावून मुसलमानांच्या आक्रमक योजनेला प्रखर परिणामकारक सफल घणाघात दिला.

त्यांनी मुसलमानांना बचावाच्या स्थितीत रेटले, आणि दिल्लीत एकत्र झालेल्या मुसलमानांपासून दिल्लीचाही बचाव केला यांत आश्चर्य ते काय ?

आज पंडित आणि त्यांचे काँग्रेसगण दिल्लीत सुरक्षित आहेत; आपापल्या आसनावर स्थिर आहेत. यासाठी हिंदुसंघटनवादी आणि शीख यांनी केलेल्या सफल संघर्षाचे त्यांनी उपकार मानावयास पाहिजेत. आणि असे हे नेहरू लाज पिऊन त्यांना उपदेशाचे घोट पाजत आहेत "प्रत्याक्रमणाचा अधिकार शासनाचा आहे !"

खरोखरच शिवाजी आणि रणजीतसिंह हे जर आज शासनारूढ असते तर त्यांनी हाच आग्रह धरला असता की लोकांनीच प्रत्याक्रमण आपल्या हाती घ्यावे. पण हा पंडित शिवाजीच्या तोऱ्यात जेव्हा सांगतो तेव्हा एकाद्या पोराने टाचा उंचावून मी राक्षसाएवढा आहे असे भासविण्याइतके पोरकट होते.

तरीही, काँग्रेसमधील आणि मंत्रिमंडळातील हिंदू बंधूंना मी कळकळीचे आवाहन करतो की मागील चुकांवरून आता तरी बोध घेऊन नुसते तत्त्ववादी न बनता हिंदुसंघटनवाद्यांशी मिळते घ्या, त्यांना साहाय्य करा, त्यांचे साहाय्य घ्या, आणि अलीकडील घटनांनी स्पष्ट केलेल्या वस्तुस्थितीला टक्कर द्या. ठळक वस्तुस्थिती अशी आहे.

(१) मुसलमानांनी हिंदुस्थानविरुद्ध युद्धाचाच उद्घोष केला आहे. हिंदुस्थान राजकीयदृष्ट्या, धार्मिकदृष्ट्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या मुस्लिम राज्य बनविण्याचा त्यांचा उद्देश आहे.

(२) अद्ययावत शस्त्रांनी हिंदुस्थानवर स्वारी करण्याची कसून सिद्धता चालली आहे. सीमेपलीकडील पठाण आणि बलूची यांच्या साहाय्याने आणि संभवतः अफगाणिस्तानच्या अमीराच्या नेतृत्वाने त्यांनी युद्धाच्या मुख्य दोन आघाड्या निर्माण करण्याची योजना केली आहे. काश्मीर व जुनागड दोहोंचा अंतर्भाव करून ही एक आघाडी आणि दक्षिणेत निजामाच्या नेतृत्वाखाली एका अंगाने मछलीपट्टण ते गोवा आणि दुसऱ्या अंगाने नागपूर विभाग (त्यावेळचे सेंट्रल प्रॉव्हिन्सेस) आणि वऱ्हाड येथे उत्थान करावयाचे आहे.

(सावरकरांच्या या वक्तव्यानंतर पाकिस्तानने आपली एक योजना कृतीत आणली. बलूची आणि पठाण (कबायली) यांना आपल्या सैनिकांसह

काश्मीरमध्ये घुसवून नरसंहार चालू केला होता. हैद्राबादकडील जुळवाजुळव चालू होती.)

(३) हिंदुस्थानातील मुसलमान त्याचवेळी विद्रोह माजवतील आणि घातपाताने हिंदुस्थानचा गळा कापतील.

(४) या इस्लामी संकटावर प्रत्याक्रमण करण्यासाठी आपल्या देशाने बलशाली सेना उभारली पाहिजे. त्यात हिंदू तेवढेच संमिलित केले पाहिजेत. दारूगोळा आणि शस्त्रास्त्रांच्या निर्माण्या उघडल्या पाहिजेत. त्यांतही कर्मचारी हिंदूच असले पाहिजेत. युद्धस्तरावर ही जुळवाजुळव झाली पाहिजे.

(५) हिंदुस्थानांतील मुस्लिम अल्पसंख्याकांना आपण स्पष्ट भाषेत सांगून ठेवले पाहिजे की पॉकिस्तानातील मुस्लिम शासन तेथील अल्पसंख्याक हिंदुशिखांना ज्या पद्धतीची चांगली किंवा वाईट वागणूक देते तशीच आणि त्याच परिमाणाने येथील मुसलमानांना हिंदुस्थान शासन वागणूक देईल. मग तो प्रतिनिधित्वाचा प्रश्न असो, शासकीय सेवांचा (नोकऱ्यांचा) असो किंवा नागरिकत्वाच्या अधिकाराचा असो.

(६) मुस्लिम आक्रमक प्रवृत्तीला टक्कर देण्यास काँग्रेसची तथाकथित राष्ट्रीय म्हणजे विद्रूप नीती किंवा गांधीनीती निष्प्रभ ठरली आहे. हे सत्य वस्तुस्थितीही दाखविते आणि काँग्रेसजनांची तशी स्वीकारोक्तीही आहे. हिंदू-हिंदुत्ववादास वचनबद्ध असलेलेच मंत्री शासनात पाहिजेत. हिंदुत्ववाद्यांची अपरिहार्यता स्वीकारण्यास आजचे काँग्रेसचे मंत्री सिद्ध नसतील तर त्यांनी त्यागपत्र देऊन देशभक्तीचा न्यूनतम परिचय द्यावा आणि हिंदुसंघटनवादी आणि शीख यांच्या स्वाधीन शासनाचा व्यवहार सोपवावा.

काँग्रेसी मंत्रिमंडळाच्या स्थानी हिंदुराष्ट्रवादी व्यक्ती समर्थ ठरतील काय हा प्रश्नच आत्मवंचक आहे. ते तेवढे तर समर्थ असतीलच, किंबहुना त्यांच्यापेक्षाही समर्थ असतील. जर राजवट हिंदू-शीख संघटन संघाकडे सोपविली गेली तर

आठवडाभरातच मंत्रिमंडळ स्थापन केले जाईल आणि ते सर्वांगाने सक्षम ठरेल, येवढेच नव्हे तर वर दिलेला कार्यक्रम ते सहर्ष स्वीकारतील आणि कार्यवाहीत आणतील. वस्तुस्थितीला तोडगा म्हणून तेवढा एकमेव उपाय आहे हे आम्ही सप्रमाण मांडलेच आहे.

(विभाजनाचे वेळी प्रकट केलेले हे वक्तव्य मराठामध्ये (इंग्रजी) दि. २५।९।४७ ला प्रसिद्ध झाले होते.

+++

परिशिष्ट (२)

नेहरूंची भीती : हिंदुराज्य !

तकलुपी महाराजे

गांधीय मंत्री, नेते आणि वृत्तपत्रे यांनी अलीकडे एक नवी विचित्रता-स्टंट-दाखविण्यास आरंभ केला आहे. त्यायोगे आपल्या राष्ट्राचा सन्मान, संपत्ती आणि प्राण वाचविण्यात त्यांना जे लाजिरवाणे अपयश आले ते झाकण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तसेच आगामी संयुक्त मतदारसंघांतून आता मुस्लिम मते आपणांस मिळावीत म्हणूनही कदाचित त्यांचा तो खेळ आहे.

(मते मिळविण्यासाठी जडलेला हा भ्रष्टाचाराचा रोग अद्यापही सुटलेला नाही हे आजच्या तेहतीस वर्षांच्या अनुभवाने वाचकांना स्पष्ट झालेले आहेच.)

पंडित नेहरू आणि त्यांचे भोंगे आजकाल पुष्कळ सभा घेत सुटले आहेत. मुस्लिम योजना आणि आव्हाने हाणून पाडण्यासाठी आपले शासन काय उपाययोजना करीत आहे हे त्या व्याख्यानांतून लोकांना सांगून त्यांना आश्वस्त करण्याच्या ठिकाणी ते हिंदुराज्याच्या मागणीविरुद्धच संतापून उठत आहेत ! जणू हिंदू-राज्याची नुसती मागणी हीच एक त्यांच्या राज्याला धोका निर्माण करणारी घटना ठरली आहे! आणि तीही इतकी भीषण आणि इतकी त्वर्य की

त्यांनी या संभाव्य धोक्याच्या निराकरणासाठी तातडीने लक्ष पुरवावे! पाकिस्तानचे मुस्लिम राज्य स्थिर झाले आहे. तिथे अधर्मान्धपणे अत्याचार, जाळपोळ, लुटालूट, रक्तपात चालू आहेत. लाखो मुसलमान नगरानगरांतून, मार्गामार्गातून उन्मत्त घोषणा देत हिंडत आहेत ''हसके लिया पाकिस्तान मारके लेंगे हिंदुस्थान!'' या प्रत्यक्ष धोक्यापेक्षाही नेहरूंना भयावह वाटत असेल तर ती हिंदुराज्याची नुसती मागणी. मुस्लिमांच्या या धोकादायक कृतींना आणि धमक्यांना नपुंसकत्वाने सहन करणारे हे पंडित आणि त्यांचे विद्रूप राष्ट्रीय गणंग मोठ्या शौर्याने धमक्या देत सुटले आहेत, हिंदुराज्य जे मागतील त्यांना ठेचून काढले जाईल!

पंडित नेहरू धमकावण्या देत आहेत की हिंदुसंघटनवादी हिंदुराज्य निर्माण करण्याचा आग्रह धरीत राहतील तर.... ? तर काय होईल? तर त्यांचीही गत तीच होईल जी हिटलर आणि मुसोलिनीची झाली. राजकीय अर्थाने बोलायचे तर गांधीजी अद्याप दुपट्यात होते आणि पंडित नेहरू जन्मलेही नव्हते त्यावेळेपासूनच ज्यांनी कर्दनकाळ ब्रिटिश सत्तेशी झुंज घेतली अशा शेकडो क्रांतिकारकांकडे हिंदुसंघटनेचे नेतृत्व आहे ही वस्तुस्थिती पंडित नेहरू विसरतात.

त्यातील कित्येकांनी ब्रिटिश खड्ग आणि फाशीचा स्तंभ यांच्या धमकीला धुडकावून लावले आणि मृत्यूला आलिंगन दिले. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी अशा वीरांनी केलेला एकेकाचा त्यागही गांधीय मंत्र्यांच्या एकत्र त्यागापेक्षा अधिक भरेल.

या पंडितासारख्या तकलुपी सरदाराच्या धमकावणीला हे क्रांतिकारक बधणार नाहीत. समजा, या क्रांतिकारकांना हिंदुत्वाच्या सन्मान रक्षणासाठी किंवा श्रेष्ठत्व रक्षणासाठी हिंदुराष्ट्र निर्माण करण्यात अपयशच आले तर त्या प्रयत्नाच्या अपराधासाठी (!) वाट्याला येईल ते कठोर भवितव्य ते आनंदाने स्वीकारतील.

ते हिटलरसारखे असो वा मुसोलिनीसारखे... पण याउलट समजा, ते क्रांतिकारक हिंदुराष्ट्र स्थापन करण्यात यशस्वी झाले तर ? तर या पंडितासारख्या हिंदुराष्ट्रद्रोही जनांची गत काय व्हावी ?

या विकृतवाद्यांचे म्हणणे असे की हिंदुराज्याची मागणी ही जातीय आहे, खोडसाळ आहे, पुराणमतवादी आहे, धर्माधिष्ठित आहे आणि मानवजातीच्या प्रगतीलाच खीळ घालणारी आहे! पण ही वरील दूषणे हिंदुराज्य या धारणेला लावण्यापूर्वी हिंदुराज्य याने त्यांना नेमके काय अभिप्रेत आहे, ते काय समजतात, हे मात्र ते सांगू इच्छित नाहीत. तथापि, वादासाठी आपण मानू की हिंदुराज्य या कल्पनेचा वरील दोषांसाठीच निषेध केला पाहिजे; तर मग मुस्लिमराज्याची मागणी ही सुद्धा निदान तेवढ्याच दोषांसाठी निषेधार्ह नव्हती काय असे आम्ही त्यांना विचारतो.

पाकिस्तानी प्रदेश म्हणून तोडून घेण्यासाठी मुसलमानांनी त्या त्या प्रदेशांत मुस्लिम बहुसंख्याक आहेत हाच पाया धरला नव्हता काय ? मग तुम्ही ती जातीय मागणी कशी सन्मानिलीत ! आणि ती इतकी सन्मानिलीत की स्वतंत्र मुस्लिम राज्याला आपल्या देशातच स्थान देण्याइतकी मूलभूत राष्ट्रीय मागणी समजून! ती मागणी जातीय म्हणून खोडसाळ म्हणून तुम्ही का धुडकारली नाहीत !

मुसलमानांनी ज्या प्रत्यक्ष कृतीचा, Direct action चा अवलंब केला त्यायोगे त्यांनी मागितलेले मुस्लिम राज्य हे पूर्णतया धर्माधिष्ठित होणारे होते हे सिद्ध झाले नव्हते काय ? आणि ज्यायोगे मानवतेच्या प्रगतीचे घड्याळ मध्ययुगीन नव्हे तर पशुयुगीन भूतकाळात उलटे फिरवून पोहोचविले जाणार होते हे सिद्ध झाले नव्हते काय ? पण मुस्लिम राज्याच्या मागणीला विरोध करण्याच्या ठिकाणी तुम्ही प्रत्यक्षात त्या अपराधाला साहाय्य केलेत अँग्लो-मुस्लिम षड्यन्त्रकाऱ्यांशी हातमिळवणी करून अखंड हिंदुस्थानची छकले जातीय आधारांवर करण्याचे पाप केलेत !

एखाद्या आदरणीय अतिथीला चहाचा पेला द्यावा इतक्या सहजपणे, इतक्या आदराने, तुम्ही ते पाकिस्तान समारंभपूर्वक मुसलमानांना अर्पण केलेत. आता

कल्पना करा की तुम्ही कल्पिलेले सर्व दोष हिंदुराज्य या कल्पनेत आहेत तरीही तुम्ही कोणत्या तोंडाने त्या मागणीची हेटाळणी करू शकता ?

विकृत गांधीय तत्त्वे

पठाणांनी हिंदुस्थानवर आक्रमण करावे आणि अफगाणिस्तानच्या अमीराला हिंदुस्थानचा सम्राट, बादशहा –म्हणून स्थापित करावे असा अलिबंधूंशी गांधींनी कट केला नव्हता काय ? त्यानंतर पुन्हा १९४० मध्ये याच गांधींनी हैद्राबादच्या निजामाने हिंदू संस्थानिकांची गळचेपी करून सीमाप्रांतातील मुस्लिम जमातींच्या साहाय्याने दिल्ली घेतली आणि तो हिंदुस्थानचा राजा झाला तर ते पूर्ण गृहराज्य– होमरूल होईल, परिपूर्ण स्वराज्य होईल. असे घोषित केले नव्हते काय ? त्याचा पुनरुच्चारही त्यांनी अनेकदा केलेला नाही काय ? म्हणजेच, एखादे पठाणी किंवा निजामी मुस्लिमराज्य हे गांधीसाठी शंभर टक्के स्वराज्य आहे ! पण हिंदुराज्य ? छे ! छे ! ते तर जातीय होईल,फॅसिस्ट होईल! राष्ट्र–विरोधी होईल ! मानवताविरोधी होईल ! !

तुमचे असेही म्हणणे आहे की आपल्या देशाचे नाव हिंदुस्थान राहणार नाही, हिंदुराज्य– राहणार नाही, कारण अहिंदू अल्पसंख्य लोकही या देशाचे नागरिक आहेत. तर मग तुम्ही सर्व, विशेषतः गांधीजी नवीन कोरून काढलेल्या इस्लामी राज्यापुढे कसे झुकता ? त्याला कशी वंदना देता ? तेथेही हिंदू, ख्रिश्चन, पारसी आणि दुसऱ्या अमुस्लिम अल्पसंख्याकांचे वास्तव्य आहेच की ! पाकिस्तान हे नावच इस्लामी पवित्रस्थान, इस्लामी राज्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. तरीही तुम्ही त्या राज्याला आदराने वंदन कसे करता ?

सर्व राज्ये, सर्व राष्ट्रे, राष्ट्रसंघाच्या परिभाषेत, लीग ऑफ नेशन्सच्या व्याख्येत राष्ट्रीय बहुसंख्याक असलेल्या गटाच्या अभिधानानेच नामकरण केली जातात ही वस्तुस्थिती नाही काय ? तुमच्या सदसद् विवेकाला याचीही कधी लज्जा वाटली नाही की त्याच न्यायाने बलुचिस्तान, वझीरीस्थान, अफगाणिस्तान, तुर्कस्थान या राज्यांनाही त्या नावाने कसे ओळखायचे ? तेथेही अमुस्लिम अल्पसंख्याकांचे

वास्तव्य आहे की ! तर मग हिंदुस्थान या नावाच्या उच्चारासरशीच, हिंदुराज्य म्हटल्याबरोबरच, तुम्हाला जणू सर्पदंश झाल्यासारखे वाटून तुमचे प्राण झटपटू लागलात ते का ?

रक्तपात की...

हे सर्व दोष असलेले पाकिस्तान हे इस्लामी राज्य तुम्ही सन्मानिलेत त्याचे एकमेव कारण तुम्ही सतत ठसविता की तुमच्यापुढे रक्तपात की पाकिस्तान हा प्रश्न उभा आणि म्हणून रक्तपात टाळण्यासाठी पाकिस्तानला संमती द्यावी असे तुमच्या मनाने घेतले! असले डरपोक कारण पुढे करण्याने तुमच्या कृतीचे समर्थन होण्यापेक्षा तुमच्या कृतीचा धिक्कारच अधिक दर्शविते. पण हे घटकाभर दूर ठेवले तरीही, हिंदूंनीही तुमच्याकडे असाच पर्याय ठेवला, 'रक्तपात की हिंदुस्थान' तर तुम्ही तुमच्या उत्तरानेच हे स्वीकारता, अनिच्छेने का होईना पण स्वीकारता की त्या स्थितीत रक्तपात टाळण्यासाठी हिंदुस्थानला मान्यता द्यावी असे तुमचे मत होईल ?

हिंदू मतदारसंघास माझी ही पुन्हा हजाराव्यांदा स्पष्ट सूचना आहे की राज्ययंत्रणेवरून हे विद्रूप राष्ट्रीय पुढारी तुम्ही घालवून देत नाही तोवर गांधीय इंडिया-निझमच्या योगाने राज्याराज्यांतील महत्त्वाची सेवास्थाने, सैन्यातली आणि आरक्षी दलांतली उच्च स्थाने मुसलमानांना हस्तगत करण्यास मोकळीक ठेवली जाईल. पाकिस्तानी सैन्याने हिंदुस्थानवर उत्तर-दक्षिण पूर्व-पश्चिम दिशांनी आक्रमण करताच हे मुसलमान आतून उठाव करतील, नेहमीप्रमाणेच आपण असावध स्थितीत असू आणि तेव्हा हे गांधीय शासन स्वतःच्याच दोषामुळे नष्ट होऊन जाईल आणि हिंदुस्थानचे अखंड पाकिस्तानात रूपांतर होईल !

युद्धविषयक तत्त्वे

म्हणून दोन व्यक्तिसमूहातून निवड करण्याची आहे अशी स्थिती नाही, तर दोन तत्त्वज्ञानातून निवड करायची आहे. इंडियन राज्य की हिंदुराज्य ही ही निवड

नव्हे, तर मुस्लिम राज्य की हिंदुराज्य, अखंड हिंदुस्थान की अखंड पाकिस्तान 'यांतून निवड करण्याची आहे !

म्हणून हिंदुसंघटनवाद्यांचे तत्त्वज्ञानच आपल्या देशाला संभाव्य संकटापासून वाचवू शकेल आणि पुन्हा आसेतुहिमाचल अखंड हिंदुस्थानची प्रस्थापना करू शकेल.

मराठा (इंग्रजी) २५-९-१९४७.

✦✦✦

वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी नेहमीच कार्यरत असणारे 'अजब'आता आपल्यासमोर घेऊन येत आहे...विविध विषयांवरील असंख्य..अनमोल पुस्तकांचा खजिना! चिमुकल्यांसाठी गमतीदार, मनोरंजनासह ज्ञानवर्धक बालवाङ्मय; दुर्मीळ, ऐतिहासिक, पौराणिक चरित्रे-आत्मचरित्रे; जुन्या काळातील लोकप्रिय पुस्तके; शेरलॉक होम्स् व शेक्सपियर यांची अनुवादित पुस्तके; पाकशास्त्र, आरोग्य, ज्योतिष, धार्मिक, आध्यात्मिक अशा दैनंदिन जीवनातील विविध विषयांवर आधारलेली अद्वितीय पुस्तके !... तरुणाईच्या मनावर राज्य करणारी सप्तरंगी विषयांवरील तसेच रोजगाराचे पर्याय देणारी अत्यंत उपयोगी आणि निवडक पुस्तके !... परिपूर्ण जीवन जगायला शिकवणारी व्यक्तिमत्त्व विकासावरील नव्या पुस्तकांची मालिका !... इतकेच नव्हे तर इतिहासात आपली नावे सोनेरी अक्षरात कोरून ठेवणारे अनेक महान लेखक.... साने गुरुजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, गोपाळ गोडसे, ना.सी.फडके, नाथमाधव, वि.वा.हडप यांची सुप्रसिद्ध पुस्तके आता आपल्याला उपलब्ध होणार आहेत अगदी अल्प किमतीत फक्त 'अजब'च्या माध्यमातूनच ! हा तर एक प्रकारचा सन्मानच आहे मराठी अस्मितेचा...मराठी मनांचा !!!

अत्यंत अल्प किमतीत पुस्तकांची विक्री करून प्रकाशन व वितरण क्षेत्रामध्ये आपला वेगळा ठसा उमटविणारी व दर्जेदार साहित्य घरोघरी पोहचविण्याचे सामाजिक कार्य करणारी महाराष्ट्रातील एकमेव मराठी प्रकाशन संस्था म्हणजे 'अजब' !!! तर मग चला... अजबच्या या स्तुत्य उपक्रमास आपणही प्रतिसाद देऊया.... मराठी साहित्याचा गौरव करूया.... आपल्या घरची साहित्यसंपदा संपन्न करूया !!!

लाल किल्यांतील आठवणी

200289

रिया पब्लिकेशन्स्

प्रमुख वितरक

अजब डिस्ट्रिब्युटर्स

e mail : riyapublications@gmail.com